मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११८ ■ सोमवार, ०५ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# थंडी मागे, ऊन्ह पुढे; पुढील ४८ तासांत हवामान कसं?

**दैनिक युवक आधार**

**नागपूर :** राज्यातील हवामानात नववर्षाच्या सुरुवातीलाच लक्षणीय बदल जाणवू लागले आहेत. गेल्या काही दिवसांतील कडाक्याच्या थंडीनंतर आता अनेक भागांत उन्हाचा कडाका वाढताना दिसतो आहे. उत्तरेकडील शीत प्रवाहाची तीव्रता कमी होणे आणि दक्षिणेकडून येणाऱ्या ढगाळ हवामानाचा परिणाम म्हणून राज्यातील किमान तापमानात वाढ नोंदवली जात आहे. पुन्हा एकदा थंडीची लाट येणार, अशा चर्चा सुरू असतानाच भारतीय हवामान खात्याने याबाबत स्पष्ट भूमिका मांडली आहे.




हवामान खात्याच्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत कडाक्याची थंडी परतण्याची शक्यता कमी असून किमान तापमान तुलनेने जास्त राहील. मात्र, पहाटे आणि रात्री गारठा जाणवण्याची शक्यता कायम आहे.

**ढगाळ वातावरणाचा परिणाम**

गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत ढगाळ वातावरण पाहायला मिळाले. या ढगांच्या आच्छादनामुळे थंडीची तीव्रता कमी झाली असून कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात वाढ झाली आहे. सध्या राज्यातील बहुतांश भागांत किमान तापमान १२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याचे निरीक्षण हवामान विभागाने नोंदवले आहे.

**कोकण आणि मुंबईत स्थिती**

चार जानेवारीला कोकण किनारपट्टीवर हवामान मुख्यतः स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. मुंबईत कमाल तापमान सुमारे ३२ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याचा अंदाज असून किमान तापमान १८ अंशांच्या आसपास राहील. दिवसा ऊन जाणवेल, मात्र सकाळी आणि रात्री सौम्य थंडी कायम राहणार आहे.

**पश्चिम महाराष्ट्रात स्थिती**

पश्चिम महाराष्ट्रात थंडीचा जोर सध्या काहीसा ओसरलेला आहे. पुण्यात कमाल तापमान ३१ अंश, तर किमान तापमान १४ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पहाटेच्या वेळेत धुक्याचं प्रमाण कायम असल्याने वाहनचालकांनी सावधगिरी बाळगण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. सोलापूरमध्ये राज्यातील उच्चांकी कमाल तापमान ३१ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले आहे.

**मराठवाडा आणि विदर्भात स्थिती**

मराठवाड्यात पुढील काही दिवस हवामान मुख्यतः कोरडे राहणार असून आकाश निरभ्र राहण्याचा अंदाज आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये किमान तापमान १५ अंश, तर कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस राहील. उत्तर महाराष्ट्रासह विदर्भातील नाशिक, नागपूरसारख्या शहरांमध्येही अशीच हवामान स्थिती राहण्याची शक्यता आहे.

**हवामान खात्याचा इशारा**

तापमानात वाढ झाली असली तरी हवामानातील अचानक बदलाचा आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे.

विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी पहाटे व रात्री गरम कपड्यांचा वापर करावा, असा सल्ला देण्यात आला आहे. एकूणच, राज्यात सध्या थंडीची तीव्र लाट नसली तरी हिवाळ्याची चाहूल पहाटे आणि रात्री जाणवत राहणार आहे. दिवसा मात्र उन्हाचा कडाका वाढत जाण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.

## दिव्यांग क्रांती संघटनेचा भाजप महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दिव्यांगांच्या हक्कासाठी काम करणाऱ्या दिव्यांग क्रांती संघटनेने पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र संघटनेकडून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. पनवेल महानगरपालिका निवडणूकीकरीता भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँगेस, आरपीआय (आठवले गट) महायुतीच्या उमेदवारांना दिव्यांग क्रांती संघटना जाहीर पाठिंबा देत असून संघटनेचे सभासद हितचिंतक व सर्व पदाधिकारी



या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी कार्य करतील, असा विश्वास दिव्यांग क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बी.जी.पाटील, महाराष्ट्र सचिव राजाराम गोरे, पनवेल व उरण तालुकाध्यक्ष संदीप काशिद यांनी दिलेल्या पाठिंबा पत्रात दिला आहे.

## मातोश्री विद्यालय महागाव येथे कायदे विषयक ज्ञानदान शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मनोज उर्फ एम.डी. सुरोशे/महागाव यवतमाळ :** मातोश्री विद्यालय महागाव येथे तालुका विधी सेवा समिती व वकील संघ महागाव यांचे संयुक्त विद्यमाने कायदे विषयक ज्ञानदान शिबिराचे आयोजन दि. 02/01/2026 ला करण्यात आले होते. कार्यक्रमाला तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश श्री. एस,आर,जैन हे प्रमुख अतिथी तथा मुख्य मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते. तसेच तालुका वकील संघ महागावचे सदस्य ॲड. सुरेश राऊत स.अधीक्षक एस. एस. तळेगावकर लिपीक मो. अझीम हे उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्यालयाच्या प्राचार्य अनुताई गावंडे ह्या होत्या. याप्रसंगी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश श्री.एस.आर. जैन यांनी शाळेचा स्वच्छ सुंदर परिसर व विद्यार्थ्यांची



असलेली शिस्त कौतुकास्पद आहे असे आपल्या बोलण्यातून व्यक्त केले. पर्यावरण संतुलनाविषयक जनजागृती करण्यात आली. स्त्री सुरक्षा विषयक जागरूकता व आपुलकीची भावना जागृत करण्यासाठी संबोधन करण्यात आले, प्रदूषण मुक्त जीवन जगणे ही काळाची गरज आहे. ही गरज लक्षात घेऊन समाजात प्रदूषणमुक्त व स्वच्छ जीवन जगण्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे, जगण्यासाठी संविधानाच्या मूलभूत कर्तव्यात आपले कर्तव्य महत्वाचे ठरते व त्याची जनजागृती व आचारण करणे आवश्यक आहे, असे उदाहरणे देऊन विध्यार्थ्यांना पटवून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. के. शिंदे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा. ए. एल. जाधव यांनी केले.






# बालविवाहमुक्त आणि लिंगसमतामूलक महाराष्ट्रासाठी निर्धार करुया - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## बेटी बचाव बेटी पढाव अंतर्गत 'आपला संकल्प' जनजागृती रॅलीला जिल्हाधिकाऱ्यांचा हिरवा झेंडा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम, दि. ३ जानेवारी लिंग गुणोत्तर हे समाजाच्या संवेदनशीलतेचे व प्रगतीचे महत्त्वाचे द्योतक आहे. मुलींचा जन्म, शिक्षण, आरोग्य आणि सन्मान याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याशिवाय लिंग गुणोत्तरात अपेक्षित वाढ होणार नाही. त्यामुळे बेटी बचाव बेटी पढाव अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाने व समाजाने मुलींच्या संरक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा. बालविवाह, लिंगभेद व भेदभावाच्या मानसिकतेला आळा घालून मुलींना समान संधी देणे ही काळाची गरज आहे. प्रशासनासोबतच नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेऊन लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

बेटी बचाव बेटी पढाव या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानाअंतर्गत 'बालविवाह मुक्त महाराष्ट्र – आपला संकल्प' या अभियानाच्या प्रभावी




अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

या प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही.एस. चौखंडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षाधीन अधिकारी गणेश ठाकरे व गजानन पडघान, निती आयोगाच्या जिल्हा प्रकल्प प्रमुख श्रीमती निलिमा भोंगाडे , जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले, डेमो स्वप्नील चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

बालविवाहास प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाला चालना देणे तसेच लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी समाजात व्यापक जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

रॅलीदरम्यान 'बालविवाह रोखा – मुलींचे भविष्य वाचवा', 'मुलगी शिकली तर समाज घडला', 'लिंगभेद नको, समानतेला होकार' अशा आशयपूर्ण घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी फलक, पोस्टर्स व घोषवाक्यांच्या माध्यमातून समाजाला प्रभावी संदेश दिला.

यावेळी पुढे मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर म्हणाले की, 'लिंग गुणोत्तर हे समाजाच्या संवेदनशीलतेचे व प्रगतीचे महत्त्वाचे द्योतक आहे. मुलींचा जन्म, शिक्षण, आरोग्य व सन्मान याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याशिवाय लिंग गुणोत्तरात अपेक्षित वाढ होणार नाही. बालविवाह ही सामाजिक कुप्रथा असून ती मुलींच्या सर्वांगीण विकासास अडथळा ठरते. त्यामुळे प्रशासनासोबतच पालक, शिक्षक, विद्यार्थी व समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन बालविवाह रोखण्यासाठी आणि लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत.

मान्यवरांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा, मुलींच्या आरोग्य व शिक्षणाचे महत्त्व तसेच बेटी बचाव बेटी पढाव योजनेतील विविध उपक्रमांची माहिती दिली.

बालविवाह आढळून आल्यास तात्काळ प्रशासनाला कळविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच संबंधित यंत्रणांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

बालविवाह मुक्त, सुरक्षित, शिक्षित आणि सशक्त मुलींचा महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरूक राहून सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.रॅलीमध्ये विविध शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते.

## उरण मधील नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक क्रीडास्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे :** उरण मधील नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिनांक 3 जानेवारी 2026 रोजी वार्षिक क्रीडास्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या, या स्पर्धांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून नागरी संरक्षणदल उरण रायगडचे विभागीय क्षेत्ररक्षक रायगड व द्रोणागिरी भूषण हरेश्वर ठाकूर स्कूलचे प्रशासक प्रदीप पाटील,स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम,याच बरोबर यशश्री राव,वैष्णवी वर्तक,रिद्धी मालवणकर व आकाश सोळंके,हे नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवकांसह सर्व शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन करून करून माता सरस्वतीव श्री साई बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून,राजमाता जिजाबाई.व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती असल्याने त्यांच्याही प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून त्याना मानवंदना देण्यात आली, आदि कार्यक्रम नंतर क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ करण्यात आला.

प्रत्यक्ष क्रिडांगणार प्रमुख पाहुण्यांचे स्वागत लेझीम व परेडने सलामी देउन मशाल प्रज्वलित करून करण्यात आले, प्रमुख पाहुण्याच्या स्वगत समारंभा नंतर क्रीडास्पर्धे साठी उपस्थित प्रमुख पाहुणे रायगड भूषण हरेश्वर ठाकूर यांनी विद्यार्थाना खेळाचे महत्व विषद करून आपणही क्रीडाक्षेत्रात नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल बरोबर उरण तालुक्याचे नाव उज्वल करावेअसे आव्हान विद्यार्थ्यांना करून यासठी त्यांनी आपल्या कडून लागणारी मदत आम्ही करू असे अश्विसत केले व विद्यार्थ्यांना क्रीडास्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी विद्यार्थ्यांनी वेगवेगळया खेळात सहभाग घेऊन आपले कौशल्य सादर केले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानसुर येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** भारतातील पहिल्या महिला मुख्याधपिका तथा शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांसाठी मुली सावित्रीबाई फुले यांच्या वेशभुषेत आल्या होत्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जान्हवी देशमुख या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन ईश्वरी तांबोळी या विद्यार्थिनीने केले.

या कार्यक्रमासाठी आरोग्य कर्मचारी श्री. अजबे सर, अंगणवाडी सेविका तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, तसेच मुख्याध्यापक झोडपे सर, सर्व शिक्षक श्री. लोकरे सर, श्री. फड सर, श्री. राठोड सर, श्री. मोमीन सर उपस्थित होते.

# म्हाळसापूरच्या सुपुत्राचे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग यश; श्याम आवटे यांना 'राज्यशास्त्रा'त पीएच.डी. प्रदान गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार सेलू तालुका प्रतिनिधी/विठ्ठल राऊत :** जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर म्हाळसापूर येथील सुपुत्र श्याम गंगाधर आवटे यांनी शैक्षणिक क्षेत्रात देदीप्यमान यश संपादन केले आहे. त्यांना नुकतीच 'राज्यशास्त्र' (Political Science) या विषयात डॉक्टरेट म्हणजेच 'पीएच.डी.' पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे म्हाळसापूर गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द श्याम आवटे यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत सर्वसामान्य असतानाही, त्यांनी शिक्षणाची ओढ कायम ठेवली. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेत असतानाच त्यांनी उच्च ध्येय उराशी बाळगले होते. शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द आणि अभ्यासातील सातत्य यामुळेच त्यांनी राज्यशास्त्रासारख्या कठीण विषयात संशोधनात्मक प्रबंध सादर करून ही सर्वोच्च पदवी मिळवली आहे.गावाचे नाव उंचावले

एका ग्रामीण भागातील तरुणाने उच्च शिक्षणातील शिखर गाठल्यामुळे म्हाळसापूर गावाचे नाव अभिमानाने उंचावले आहे. " श्याम आवटे यांच्या यशामुळे गावातील इतर तरुण विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणासाठी मोठी प्रेरणा मिळणार आहे," अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत. सर्वत्र कौतुक श्याम आवटे यांना पीएच.डी. पदवी प्रदान झाल्यानंतर राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल म्हाळसापूर गावात आनंद साजरा करण्यात येत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस उदंड शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# सावधान! १८ वर्षांखालील मुलांना वाहन चालवू दिल्यास पालकांनाही ३ वर्षांची शिक्षा


**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** १८ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलांना दुचाकी किंवा चारचाकी वाहन चालविण्यास दिल्यास आता केवळ अल्पवयीन नव्हे, तर त्यांचे पालकही थेट कायदेशीर कारवाईच्या कचाट्यात येणार आहेत. या संदर्भात पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांनी शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना अधिकृत पत्रक पाठवून कठोर इशारा दिला आहे.शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अल्पवयीन मुले वाहन चालवत असल्याचे प्रकार वाढले असून, त्यामुळे अपघातांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिसांनी मोटार वाहन कायदा, भारतीय न्याय संहिता तसेच बाल न्याय (JJ) कायदा कलम १८ अंतर्गत कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.पत्रकानुसार, १८ वर्षांखालील मुलांना वाहन चालविण्यास परवानगी दिल्यास पालकांना दोषी धरून गुन्हा दाखल केला जाईल. संबंधित पालकांना २५ हजार रुपयांपर्यंत दंड तसेच तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. विशेषतः ५० सीसीपेक्षा अधिक क्षमतेची वाहने चालविल्यास कारवाई अधिक कठोर असेल.अपघात झाल्यास संबंधित वाहनाचा विमा दावा (Insurance Claim) नाकारला जाणार असून, भविष्यात संबंधित मुलास नोकरी, पासपोर्ट, चारित्र्य प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. गंभीर प्रकरणांमध्ये २५ वर्षांपर्यंत वाहन परवाना नाकारण्याची तरतूदही करण्यात आली आहे.या आदेशाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे, तसेच ही माहिती पालकांपर्यंत पोहोचवावी, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत. सदर आदेश पालक व विद्यार्थ्यांच्या WhatsApp समूहांवर प्रसिद्ध करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.दरम्यान, "पालकांनी आपल्या अल्पवयीन पाल्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून त्यांच्या हातात वाहन देऊ नये. नियमभंग करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई केली जाईल," असा स्पष्ट इशारा बीड जिल्हा पोलिसांनी दिला आहे

## शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**पळासदळ (ता. एरंडोल) :** येथील शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये दि. ३ जानेवारी रोजी भारतातील पहिल्या शिक्षिका, स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या व सामाजिक परिवर्तनाच्या अग्रदूत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची संकल्पना संस्थेच्या सचिव सौ. रूपा शास्त्री यांची होती.महा विद्यालयाच्या परंपरेनुसार सावित्रीबाईंच्या लेकींचे




प्रतीक म्हणून महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापिका प्रा. अनिता वळवी यांना प्रतिमापूजनाचा मान देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. पराग कुलकर्णी होते. यावेळी प्रा. जावेद शेख, प्रा. अनुप कुलकर्णी, महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. पराग कुलकर्णी यांनी स्त्रीशिक्षण, समाजसुधारणा व समानतेच्या लढ्यात सावित्रीबाई फुले यांचे अतुलनीय योगदान विशद केले. आजच्या पिढीने सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनुप कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दिग्विजय पाटील यांनी केले.

## श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** पहिल्या महिला शिक्षिका, समाजसेविका,स्त्री शिक्षणाची मूहुर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त श्री शिवाजी विद्यालय रिसोडच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

प्राचार्य श्री संजय देशमुख, उपप्राचार्य श्री संजय नरवाडे,पर्यवेक्षक श्री गजानन भिसडे, शिक्षक प्रतिनिधी श्री खुशाल राठोड, ज्येष्ठ प्रा.श्री अरुण लिमजे, ज्येष्ठ शिक्षिका सौ.शोभा राऊत यांच्या हस्ते



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल प्राचार्य श्री संजय देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले, या प्रसंगी उपप्राचार्य श्री संजय नरवाडे पर्यवेक्षक श्री गजानन भिसडे ,ज्येष्ठ शिक्षिका शोभा , प्रा.मो.जुनेद, शिक्षिका साबिया शेख तसेच विद्यार्थीनींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री डीगांबर पाचरण यांनी केले तर आभार विद्यार्थिनी कु. कोल्हे हिने मानले.

## प्रभाग क्रमांक १२३ मध्ये भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे उमेदवार अनिल भाई निर्मळे यांची प्रचारात जोरदार आघाडी ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल भाई निर्मळे यांची संपूर्ण प्रभागात आमदार राम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत जोरदार प्रचार फेरी सुरू असून,याला प्रभागातील नागरिकांचा विशेषतः तरुणाईचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद पाठिंबा मिळत आहे.तसेच प्रभाग क्रमांक १२३ मध्ये अनिल भाई निर्मळे यांची प्रचार फेरीत आणि प्रचारात ही जोरदार आघाडी बघायला मिळत आहे. या प्रचार फेरी दरम्यान अनिल भाई निर्मळे हे प्रभागातील नागरिक तसेच प्रभागातील व्यापारी वर्गाशी संवाद साधत प्रभागाच्या विकासाविषयी चर्चा करत आहेत.तसेच यावेळी प्रभागातील स्थानिक नागरिकांनी ही या प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनिल भाई निर्मळे यांचे स्वागत केले.

प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे उमेदवार अनिल भाई निर्मळे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १२३ मध्ये विकासाभिमुख,पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार व्यक्त केला.प्रभाग क्रमांक १२३ चा सर्वांगीण विकास,नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांचे वेळेत निराकरण आणि सुशासन हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी अनिल भाई निर्मळे यांनी सांगितले.या प्रचार फेरीत भाजप महायुतीचे उमेदवार अनिल भाई निर्मळे यांच्या सोबत मंडळ अध्यक्ष - संतोष गांजले,शिवसेना समन्वयक - मंगेश मोहिते,भाजप १२३ चे वॉर्ड अध्यक्ष - महेश गुप्ता,प्रभाग क्रमांक १२३ चे शिवसेनेचे शाखाप्रमुख - सुनील सोडा,महिला शाखाप्रमुख - पूजा पवार हे देखील उपस्थित असताना दिसत आहेत.



## नारखेड येथील पी एम श्री जि . प . शाळेत सावित्रीबाई फुले जयंती व बालिकादिन उत्साहानं साजरा

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा :** नारखेड तालुका नांदुरा येथील पीएमश्री जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा नारखेड येथे दिनांक३ जानेवारी२०२५ रोजी नाविन्य पद्धतीने बालिका दिन म्हणजेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिकादिन म्हणून साजरी करण्यात आली मुख्याध्यापक रविंद्र आखरे सर तथा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र बाबुसिंग डाबेराव आणि स्था . प्रा . सदस्य / शाळा व्य स सदस्य ' पत्रकार गजानन डाबेराव सदस्या सौ .सरस्वती ताई सोळंके सौ . पुष्पाताई तायडे आणि सर्व शिक्षकांनी गौरव निकम सर ,सौ अर्चनाताई तांदुळकर कु . ज्योतीताई सोळंकेताई सौ . देठे ताई योगाशिक्षक गणेश बकाल आणि सौ सुशिर ताई सौ तायडे ताई सौ राजपूतताई सौ तांदळेताई ' डाबेरावताई ई आंगणवाडी ताई यांनी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हारार्पन करून पूजन केले सावित्रीच्या लेकींचे योग्य सन्मानासह बालिका दिन सुकामेवा वाटप करून शिक्षक मुख्याध्यापक आणि विशेषबाब म्हणजे शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या व विद्यार्थ्यांच्या भाषणासह ' चारोळ्या सह साजरा करण्यात आला . अगदी पहिली दुसरी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये न वाचता भाषण केले त्यामध्ये दुसरीचा शौर्य ३ री चा समर्थ नेमाडे , श्रावणी बोरसे , यांनी भाषण व ४ थी ची ज्ञानेश्वरी मारोती खराटे 'आणि५ वी ची प्रांजल डाबेराव हिने चारोळी व सुषमा काटोले ' वर्ग ६वी चे अभय



चरणसिंग सोळंके हा विद्यार्थी उत्कृष्ट क्रांती सुर्य ज्योतीबा फुले यांचे वेशभुषेत येवून भाषण केले . तसेच कार्तिक नेमाडे आणि कृष्णाली संजय डाबेराव , साक्षी खोंदिल ' श्वेता डाबेराव , व वर्ग ८वी चे शाळेची शालेय मंत्रीमंडळाची मुख्यमंत्री गौरी प्रदिप लाहुडकार ' पद्मा तायडे , आरती वैतकार ' आचल उमाळे यांनी भाषण तर गायत्री डाबेराव हिने चारोळी सादर केली ' सर्वांनी तोंडपाठ व छान भाषण व चारोळ्या सादर करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन बालीका दिन म्हणून साजरा केला . छोट्या बालिका सावित्रीबाईंच्या उत्कृष्ट वेशभुषेत होत्या त्यापैकी खुशी नितिन राहटोळे या विद्यार्थीनी वेशभुषा आकर्षक होती पहिलीतील आरोही अमोल खंडेराव , ऐश्वर्या सोळंके .४ थी च्या ज्ञानेश्वरी मारोती खराटे व भाविका विष्णू वरखेडे यांनी उत्कृष्ट सावित्रीबाई चा वेशभुषा केली होती . सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला योगाशिक्षक गणेश बकाल यांनी उत्कृष्ट संगित कवायत घेतली कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचलन गौरव निकम सर व गौरी लाहुडकार यांनी केले तर आभारप्रदर्शन ज्योतीताई सोळंके मॅडम यांनी केले .

# श्री मतोबा महाराज यात्रोत्सवास उत्सहात प्रारंभ

## पहील्याच दिवसी तीस हजार भाविकांची हजेरी- देवस्थान ट्रस्ट

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी :** लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व नैताळे ग्रामस्थांचे अराद्य दैवत श्री मतोबा महाराज यात्रोत्सवास आज उत्सहात प्रारंभ झाला. यांत्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी देवस्थान ट्रस्टच्या वतीने "महापुजा" व "रथ पुजा"अशा धार्मीक कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर रथ मिरवनुकीस प्रारंभ करण्यात आला रथाची मिरनुक दुपारी ३ वाजेपर्यंत सुरु होते यात्रोत्सवाच्या आज पहील्याच दिवसी जवळपास तीस हजार भाविकानी श्री मतोबा महाराजांचे मनोभावे दर्शन घेतल्याची माहीती देवस्थान व्यावस्थापनाने दिली आहे.

नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या नैताळे येथे दरवर्षाप्रमाने याही वर्षी पौष पोर्णिमेला श्री मतोबा महाराज यांचा यात्रोत्सव भरविण्यात आला आहे हा उत्सव अखंड १५ दिवस सुरु राहणार आहे आज यात्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी पहाटे ५ वाजता भागवताचार्य ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली शिंदे, सुनिल जैन,. भारती जैन तसेच दर्शन रांगेत उभ्या



असलेल्या भाग्यवान भाविक म्हणून प्रविण पाटील, अनिता पाटील यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांच्या नविन चांदीच्या मुर्तीची "महापुजा" करण्यात आली यावेळी विंचूरचे गुरु श्रीनिवास जोशी यांनी पुरुहितत्व केले. तर सकाळी ९ वाजता बोकडदरे येथील भारत माता आश्रमाचे महंत श्री महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज व रथाचे मानकरी मोहन खापरे यांच्या हस्ते रथ मिरवनुकीस प्रारंभ करण्यात आला. यावर्षी रथ मिरवनुकीस प्रारंभ करताना रथाला पहिली बैलजोडी जुंपण्याचा मान सिन्नर तालुक्यातील भाटवाडी येथील शेतकरी नंदकिशोर महात्मे यांना देण्यात आला होता. भाविकांचे दर्शन सहज सुलभ व्हावा म्हणून दर्शन रांगेची व मंडपाची व्यवस्था करण्यात आली आहे.मंदीर परिसरात अनेक "प्रसाद"व्यावसायिकांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.मंदिरावर आकर्षक विद्युत रोषनाई करण्यात आली आहे.मंदिर व परिसरात गर्दीच्या नियंत्रणासाठी स्वयमसेवकाच्या नेमनुका केल्या आहेत.भाविकांना पिण्यासाठी शुध्द पाण्याची व्यवस्था केली आहे.नारळ फोडण्यासाठी मशिनची व्यवस्था करण्यात आली आहे.यात्रा कालावधीत दररोज सकाळी ६ वाजता ,दुपारी १२ वाजता व संध्याकाळी ७ वाजता संगितबध्द आरतीचे नियोजन करण्यात आले आहे.जिल्ह्यातील अनेक नामवंत बँन्ड पथकानी यात्रोत्सवास हजेरी लाऊन आपआपली वाद्यकला सादर केली त्यानिमीत्ताने हजारो भाविकांनी मनमुराद नाचण्याचा आनंद घेतला.

**निफाड पोलिसांचे आतिशय शिस्तबध्द व चोख नियोजन..!**

नाशिक-छत्रपती सभांजीनगर महामार्गावर पिंपळस (रामाचे ) ते येवला दरम्यान रस्त्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे परंतु नैताळे येथील श्री मतोबा महाराज यात्रोत्सवाच्या २५ दिवसापुर्वीच अंदाज घेऊन निफाड पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी रस्त्याचे काम वेळेत होण्यासाठी समंधीत आधिकार्याना पत्रव्यवहार केला होता त्यामुळे नैताळे शहराच्या दोन्हीही बाजूने रस्त्याचे काम पुर्ण करण्यात येऊन रस्ता वाहतुकीस मोकळा करण्यात आला आहे. आज यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवसी पोलिस निरिक्षक गणेश गुरव यांनी वाहतुकिचा व गर्दिचा अंदाज घेऊन स्वतः उपस्थित राहुन कर्मचाऱ्यांच्या विविध ठिकानी नेमनुका करुन वाहतुक कोंडी नियंत्रणात आणली.

१)श्री मतोबा महाराज यांच्या नविन चांदीच्या मुर्तीची पुजा करताना भागवताचार्य ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली शिंदे ,सुनिल जैन ,भारती जैन व प्रविण पाटील ,आनिता पाटील,

२) रथ मिरवनुकीस प्रारंभ करताना महंत श्री महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज व रथाचे मानकरी मोहन खापरे

# ऊर्जा संवर्धन ही काळाची गरज असून सौर ऊर्जेच्या वापरावर भर द्यावा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहांतर्गत वाशिम येथे कार्यशाळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे / वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम,पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा वापर वाढविणे ही आजच्या काळाची अत्यंत गरज असून सौर ऊर्जेच्या वापरावर भर द्यावा असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त नियोजन भवन येथे आयोजित ऊर्जा बचत – काळाची गरज, ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व व सध्याची शासकीय धोरणे या विषयावरील कार्यशाळेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी




शाहू भगत, कृषी उपसंचालक हिना शेख, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी प्रफुल्ल खंडारे, महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक विजय काळे, ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक अच्युत मेहेंदळे तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी सांगितले की, अनेक शासकीय कार्यालयांना वाढत्या वीज देयकांमुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. शासकीय इमारतींवर सौर ऊर्जेचा वापर केल्यास वीजबिलात मोठी बचत होऊन ऊर्जा आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करता येईल. ऊर्जेची बचत ही केवळ गरज नसून जबाबदारी आहे. दैनंदिन जीवनात छोटे-छोटे उपाय अवलंबल्यास मोठ्या प्रमाणात ऊर्जा संवर्धन साध्य होऊ शकते. भविष्यात विजेची मागणी वाढणार असल्याने आजपासूनच ऊर्जा बचतीची सवय लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांनी सौर व हरित ऊर्जेचा स्वीकार करून हरित व उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. घुगे यांनी सांगितले की, प्रदूषणमुक्त ऊर्जा मिळविणे ही काळाची गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येला तोंड देण्यासाठी ग्रीन एनर्जीचा वापर वाढवावा लागेल. लहान उपाययोजनांतूनही प्रभावी ऊर्जा संवर्धन शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक श्री. मेहेंदळे यांनी वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि वाढत्या ऊर्जा गरजांमुळे पारंपरिक ऊर्जास्रोतांवर ताण वाढत असल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जा हा स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्याय असून कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले. ऊर्जा बचतीचा वसा जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.यावेळी विजय काळे यांनी महाऊर्जेच्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.कार्यशाळेच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ऊर्जा बचतीची प्रतिज्ञा घेतली.

# धनगर समाजाला दिलेला शब्द तुम्ही पाळला नाही दिपक बोराडे

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** धनगर समाजाला एस टी प्रवर्गात समावेश करण्याचा शब्द देवूनही अद्याप या सरकारने शब्द पाळला नाही यामुळे सरकारने धनगर समाजाची दिशाभूल केली असल्याचे प्रतिपादन पाथरी येथे एका कार्यक्रमात धनगर समाजाचे नेते दिपक बोराडे यांनी यावेळी बोलताना सांगितले यावेळी पाथरी तालुक्यातील सर्व धनगर समाज या कार्यक्रमास मोठ्या संख्येने सहभागी झाले होते धनगर समाजाचे नेते दिपक बोराडे यांचे पाथरी शहरांमध्ये धनगर समाजबांधवांच्या वतीने भव्य दिव्य अशी ढोल ताशांच्या गजरात जी सी बी च्या सह्यांनी फुलांची उधळण करीत भव्य असे स्वागत करण्यात आले



त्यानंतर समाजबांधवांनी आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमाला दिपक बोराडे यांनीच प्रमुख उपस्थिती होती पूढे बोलताना धनगर समाजाचे नेते दिपक बोराडे मानले कि राज्यांतील या सरकारने धनगर समाजाची दिशाभूल केली निवडणूकीच्या काळात मताचा वापर करून समाजाला फसविण्याचे काम करण्यांत आले धनगर समाजाच्या आरक्षणाच्या लढ्या मध्ये अनेक समाज बांधवांनी आपल्या जीवाची आहुती दिली तरी या सरकारला अद्याप ही जाग नाही सरकार वेळोवेळी धनगर समाजाला फसविण्याचे काम करीत असले तरी ही आता धनगर समाज फसणार नसुन आता हक्काचे आरक्षण आहे ते मिळवण्यासाठी २१ जानेवारी रोजी धनगर समाजाचे पिवळे वादळ मुंबई येथे लाखोंच्या संख्येने धडकणार आहे तर समाज बांधव मुंबईत येण्याच्या अगोदरच समाजाचे हक्काचे आरक्षण सरकारने द्यावे अन्यथा येणाऱ्या काळात सरकारला याचा परिणाम भोगावे लागले असे प्रतिपादन यावेळी धनगर समाजाचे नेते दिपक बोराडे यांनी पाथरी येथे एका कार्यक्रमात सांगितले

# श्रेष्ठ संघटक : सावित्रीबाई फुले

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** भारतीय समाजाच्या जडणघडणीत आजपर्यंत अनेक समाजसुधारकांनी महत्त्वाचा वाटा उचलला आहे, त्यामध्ये सावित्रीबाई फुले यांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. ज्या समाजात स्त्रियांनी शिकणे पाप मानले जात होते, विविध अनिष्ठ रुढी-परंपरामध्ये हा समाज अडकून पडला होता, त्या समाजात सावित्रीबाईंनी शिक्षणाची मशाल हातात घेत विरोधक, अपमान व वाटेतील अनेक संकटांचा सामना करत शिक्षण, स्त्रीसमानता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित एक सशक्त चळवळ उभी केली. या सर्व शक्तींना एकत्रित करत त्यांच्या विचारांना नवी वैज्ञानिक दिशा देत त्यांना संघटित कृतीकडे प्रवृत्त करत समाजबदल घडवून आणणे, हे सावित्रीबाईंच्या संघटक व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. आणि म्हणूनच सावित्रीबाई फुले यांचे कार्य एक श्रेष्ठ संघटकाचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

एका उत्कृष्ट संघटकाचा महत्त्वाचा गुण म्हणजे धैर्य आणि भविष्यात येणारे संभाव्य धोके सहन करण्याची वृत्ती. १९ व्या शतकातील भारतीय समाज हा अत्यंत रुढीवादी, कर्मकांड, जातीवाद, पुरुषप्रधान असा होता. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हताच पण शूद्र-अतिशूद्र समाज तर अज्ञानाच्या अंधारातच हेतुपुरस्सर ठेवला जात होता. सामाजिक अन्यायाला धार्मिक आधाराची जोड देत अन्याय अत्याचाराची चक्र सुरू होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत सावित्रीबाई फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य हाती घेतले व नियोजनबद्ध संघटना उभारून उत्कृष्ट समाज व्यवस्थापन केले.

सावित्रीबाई व ज्योतिराव फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा स्थापन केली व सावित्रीबाई आद्य भारतीय शिक्षका झाल्या. त्यांनी सुरू केलेल्या शाळा यशस्वीपणे चालवणे ही मोठे आव्हान होते. समाजाचा विरोध टीका अपमान आणि धमक्या यांचा सामना करताना त्यांनी शिक्षक पालक आणि समाजसुधारक यांना एकत्र आणले. शिक्षण ही सामाजिक गरज आहे हा विचार लोकांच्या मनात रुजवण्यासाठी त्यांनी सातत्याने संवाद साधला. शिक्षणाभोवती त्यांनी एक मजबूत शैक्षणिक संघटना उभी केली. जी त्यांच्या संघटन कौशल्याची उत्तम उदाहरण होते. याची फलश्रुती म्हणून सावित्रीबाई यांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेतील वर्षाअखेरीस मुलींची संख्या ही २५ एवढी झाली. त्या काळात पहिल्याच शाळेतील मुलींची एवढी संख्या लक्षणीय म्हणावी अशी होती. त्यांची उत्कृष्ट संघटन क्षमता विशेष उल्लेखनीय आहे. एकाच वेळी अनेक शाळांचे व्यवस्थापन, शिक्षकांचे नियोजन, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि शिस्त यांकडे त्यांनी काटेकोर लक्ष दिले. कोणतीही आधुनिक प्रशासकीय साधने नसताना त्यांनी शाळांचे दैनंदिन कामकाज प्रभावीपणे हाताळले, हे त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचे ठळक उदाहरण आहे. सावित्रीबाई फुले या केवळ स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूतच नव्हत्या, तर त्या एक कुशल व्यवस्थापक आणि प्रभावी संघटकही होत्या. प्रतिकूल सामाजिक परिस्थितीतही त्यांनी शिक्षण व समाजसुधारणेचे कार्य यशस्वीपणे उभे केले. त्यांच्या कार्यामागे उत्तम नियोजन, संघटन, नेतृत्व आणि नैतिक मूल्यांवर आधारित व्यवस्थापन दडलेले होते.

महिलांच्या प्रश्नांकडे पाहताना सावित्रीबाई फुले यांची भूमिका अत्यंत संवेदनशील आणि व्यावहारिक होती. विधवा स्त्रिया, परित्यक्ता महिला आणि समाजाने नाकारलेल्या स्त्रियांना आधार देण्यासाठी त्यांनी आश्रयगृहे सुरू केली. या स्त्रियांना एकत्र आणून त्यांना सुरक्षित वातावरण, मानसिक आधार आणि स्वाभिमान दिला. या कार्यासाठी त्यांनी अनेक सहकाऱ्यांना जोडले आणि सेवा कार्याला संघटित स्वरूप दिले.

'बालहत्या प्रतिबंधक गृह' ची स्थापना महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८६३ मध्ये पुण्यात केली होती. हे भारतातील पहिले केंद्र होते की, जिथे विशेषतः गरोदर विधवा आणि बलात्कार पीडित महिलांना सुरक्षित प्रसूती आणि आश्रय देण्यात येत असे. जेणेकरून त्या आणि त्यांची मुले समाजाच्या तिरस्कारापासून वाचू शकतील आणि भ्रूण हत्येसारख्या घटनांना आळा बसेल. या बालहत्या प्रतिबंधक गृहाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारत सावित्रीबाईंनी समाजसेवक, दाई, डॉक्टर आणि सहानुभूती असलेल्या लोकांना एकत्र करत समाजातील गंभीर समस्यांवर संघटित उपाय करण्याचे उत्तम उदाहरण मांडले. आपल्या या बालहत्या प्रतिबंधक गृहातील एका मुलाला त्यांनी दत्तक घेऊन त्याचे संपूर्ण जबाबदारी स्वीकारली व त्यालाच आपला वारस बनविला. पुढे तोच मुलगा डॉक्टर झाला, डॉ. यशवंत ज्योतीराव फुले. प्लेग सारख्या महाभयंकर महामारी मध्ये त्यांनी फार मोलाची जबाबदारी बजावली. आपल्या उक्तीप्रमाणे कृती अशीच सावित्रीबाईंची शिकवण जी त्यांनी प्रत्यक्षात अमलात आणली.

२४ सप्टेंबर १८७३ साली महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या चळवळीत सावित्रीबाई फुले यांची भूमिका अत्यंत मोलाची होती. त्या केवळ चळवळीच्या सदस्य नव्हत्या तर तिच्या व्यवस्थापक आणि प्रेरणास्थान होत्या. सावित्रीबाईंनी स्वतः महिला विभागाचे प्रतिनिधित्व केले. 'महिला सेवा मंडळ' स्थापन करून सर्व जातींच्या महिलांना एकत्र आणून समानतेचा संदेश दिला. जातीभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक अन्याया विरोधात लोकांना संघटित करणे हा सत्यशोधक समाजाचा उद्देश होता. सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजात शिक्षण, सामाजिक समता आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी अग्रगण्य भूमिका बजावत अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि कर्मकांडांना विरोध केला. विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि सत्यशोधक विवाहांना प्रोत्साहन दिले. सभा, चर्चासत्रे आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी सामान्य लोकांना विचारप्रवृत्त केले. तसेच ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे नेले. त्यामुळे त्या सत्यशोधक चळवळीच्या खऱ्या प्रणेते ठरल्या. लोकांमध्ये आत्मभान निर्माण करणे आणि त्यांना अन्यायाविरोधात उभे करणे हे त्यांच्या संघटक कार्याचे केंद्रबिंदू होते.

सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षणतज्ज्ञ किंवा समाजसुधारकच नव्हत्या, तर संकटाच्या काळात प्रभावी व्यवस्थापन करणाऱ्या कुशल नेत्या होत्या. दुष्काळ व उपासमारीसारख्या आपत्तींच्या वेळी त्यांनी दाखवलेली व्यवस्थापन क्षमता आजही प्रेरणादायी आहे. १९ व्या शतकातील दुष्काळात समाजातील गरीब, दलित, महिला, विधवा, लहान मुले व प्राणी हे सर्वाधिक त्रस्त घटक होते, हे सावित्रीबाईंनी अचूकपणे ओळखले. समस्येची तीव्रता समजून घेऊन त्यांनी उपासमार ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून सामाजिक जबाबदारी असल्याचा दृष्टिकोन स्वीकारला. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी सावित्रीबाईंनी योग्य नियोजन व संघटन केले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सहकार्याने त्यांनी अन्नदान पदयात्रा काढली. अन्नवाटप, निवारा व प्राथमिक मदतीची व्यवस्था उभी केली. उपाशी लोकांना वेळेवर अन्न मिळावे यासाठी मदत केंद्रे सुरू करण्यात आली. या केंद्रांचे संचालन शिस्तबद्ध पद्धतीने केले जात असे. मर्यादित साधनसंपत्ती असतानाही उपलब्ध अन्नधान्य, कपडे व आर्थिक मदत यांचा योग्य उपयोग करून गरजूंपर्यंत मदत पोहोचविण्यात त्या यशस्वी ठरल्या. या अन्नछत्रामध्ये १२ वर्षा खालील मुलांना दोन वेळचे जेवण मोफत मिळत असे. संकटाच्या काळात सावित्रीबाईंनी नेतृत्वगुणांचा उत्कृष्ट प्रत्यय दिला. त्या स्वतः मदतकार्यांत सहभागी होत, त्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळत असे. त्यांनी सहकार्य, समन्वय व समानतेच्या तत्त्वावर काम करून समाजातील विविध घटकांना एकत्र आणले. विशेषतः महिला व मुलांसाठी सुरक्षित निवाऱ्यांची व्यवस्था करणे, आजारी लोकांची काळजी घेणे आणि त्यांना मानवी सन्मानाने वागवणे हे त्यांच्या व्यवस्थापनाचे व नेतृत्व गुणाचे वैशिष्ट्य होते. सावित्रीबाई फुले यांचे व्यवस्थापन केवळ तात्कालिक मदतीपुरते मर्यादित नव्हते, तर त्यामागे दूरदृष्टी होती. उपासमारीचे मूळ अज्ञान, विषमता व अन्यायात आहे, हे ओळखून त्यांनी शिक्षण व सामाजिक सुधारणांवर भर दिला. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांचे दुष्काळातील कार्य हे मानवी मूल्यांवर आधारित, समतावादी व प्रभावी व्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण मानले जाते.

सावित्रीबाई फुले यांची संघटन शक्ती त्यांच्या साहित्यातून दिसून येते. त्यांनी समाज जागृतीसाठी कविता केल्या. सावित्रीबाईंनी 'काव्यफुले' या काव्यसंग्रहामध्ये स्त्रिया आणि शोषितांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व अन्यायाविरोधात आवाज उठवण्याची प्रेरणा दिली. विचार आणि कृती यांचा समन्वय साधून त्यांनी संघटन अधिक प्रभावी केले.

सावित्रीबाई फुले या केवळ विचारवंत नव्हत्या, तर कृतिशील संघटक होत्या. समाज परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गुणांनी युक्त असलेल्या श्रेष्ठ संघटक होत्या. त्यांनी उभ्या केलेल्या संस्था, घडवलेले कार्यकर्ते आणि समाजमनावर रुजवलेली मूल्ये आजही मार्गदर्शक आहेत. शिक्षण, समानता आणि मानवता या मुलांवर आधारित संघटन कसे उभे करावे, याचा आदर्श सावित्रीबाई फुले यांनी भारतीय समाज मनाला दिला. दुष्काळ, पूर आणि साथीच्या रोगांच्या काळात त्यांनी समाजसेवेसाठी केलेले कार्य, स्वयंसेवकांना एकत्र करून आजारी लोकांची केलेली देखभाल, प्लेगच्या काळात केलेली सेवा, याद्वारे त्यांच्या उदार स्वभावाची प्रचिती येते. स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी रुग्णांची काळजी घेतली. या सेवेतच त्यांचा मृत्यूही झाला. समाजासाठी कार्य करताना स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवण्याची वृत्ती, हीच त्यांच्या संघटक नेतृत्वाची खरी ओळख होती. त्यामुळेच भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात श्रेष्ठ संघटक म्हणून सावित्रीबाई फुले यांची स्थान अढळ आणि प्रेरणादायी आहे.



**सहा. प्रा. मेघा सुरेशराव चिमणकर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.**

# हरिनामाचा गजर; प्रभाग ७ मध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



**अखिल घाटकोपर वारकरी मंडळ आयोजित भव्य कीर्तन सोहळा सप्ताह वर्ष चौदावे स्थळ श्री सिद्धि गणेश मंदिर मैदान भटवाडी घाटकोपर पश्चिम येथे संपन्न झाला सदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सर्व घाटकोपर भूषण तसेच भागवताचार्य आनंद भूषण गुरुवर्य ह भ प पोपट महाराज चकवे, हरिभक्त परायण श्री नामदेव महाराज दुधाटे सर शास्त्री, परमपूज्य सद्गुरु ह भ प दादा महाराज मोरे माऊली व ज्ञानेश्वरी निरूपणाचार्य आनंद भूषण ह भ प श्री संपत महाराज हांडे तसेच गायक रुंद ह भ प नरेंद्र महाराज उत्तेकर देवचंद महाराज मोरे अशोक महाराज गुरसाळे, तानाजी महाराज तांबारे ज्ञानोबा महाराज कळंबे माऊली तसेच चोपदार ह भ प राजाराम महाराज चव्हाण विणेकरी ह भ प बाळशिरस कालेकर मृदुंगमणी ह भ प विश्वनाथ महाराज जाधव निवृत्ती शिंदे सहदेव साळेकर वैष्णव कळंबे तसेच सदर मंडळाचे संस्थापक साईभक्त कार्यसम्राट समाजसेवक श्री दीपक बाबा हांडे प्रमुख मार्गदर्शक श्री संतोष उर्फ बाबुशेठ साळुंखे मंडळाचे अध्यक्ष ह भ प श्री बाळासाहेब उर्फ नाना हांडे उपाध्यक्ष ह भ प श्री वसंत पाडेकर ह भ प श्री ज्ञानेश्वर कळंबे श्री नंदू शेठ तांबे सेक्रेटरी संदेश भेंके खजिनदार श्री विजय भोसले सह सेक्रेटरी श्री प्रकाश साबळे व समस्त विविध वारकरी व भजन मंडळ यांच्या सहकार्याने रविवार दिनांक 4 जानेवारी रोजी संपन्न झाला**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराने अंतिम टप्प्यात प्रवेश केला असून या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ७ मध्ये भारतीय जनता पक्षाने जोरदार प्रचार करत विकास, संस्कृती व परंपरेचा प्रभावी संदेश दिला आहे. कमळाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रभागात भाजपच्या प्रचाराला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.प्रभाग क्रमांक ७ मधून भाजपकडून माजी नगरसेवक राजेंद्रकुमार शर्मा, प्रमिला पाटील, अमर पाटील तसेच नव्याने निवडणूक रिंगणात उतरलेल्या मनाली ठाकूर हे चारही उमेदवार प्रचारात पूर्ण ताकदीनिशी सहभागी झाले आहेत. घराघरांत भेटी, मतदारांशी थेट संवाद, प्रचार फेऱ्या, बैठका तसेच सामाजिक व धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रचार सुरू आहे.

प्रचाराचा एक भाग म्हणून शुक्रवारी रात्री कळंबोली सेक्टर १४ येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला भाजपच्या चारही उमेदवारांनी उपस्थिती लावली. विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था व शिवशक्ती मित्र मंडळ, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने २८ डिसेंबर ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक व सांस्कृतिक सप्ताहात राज्यभरातील नामांकित कीर्तनकारांचे



कीर्तन, दररोज हरिपाठ, शिवमहापुराण कथा, हरिभजन तसेच विविध भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा समाजात सकारात्मक ऊर्जा, सामाजिक एकोपा व संस्कार रुजवण्याचे कार्य करत आहे. या भक्तिमय वातावरणात भाजपच्या उमेदवारांनी हरीभजनात सहभाग घेत "राम कृष्ण हरी"च्या गजरात भक्तिरसात तल्लीन होत हिंदू संस्कृती, परंपरा व श्रद्धेचा संदेश दिला. यावेळी वारकरी संप्रदायाशी संवाद साधत धार्मिक परंपरांप्रती भाजपची बांधिलकी अधोरेखित करण्यात आली. मतदानात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे शहर व मंडलस्तरीय पदाधिकारी, बूथ व शक्तिकेंद्र प्रमुख, महिला आघाडी व युवक कार्यकर्ते तसेच परिसरातील भाविक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक वारसा आणि विकासाचा अजेंडा यांची सांगड घालत भाजपने प्रभाग क्रमांक ७ मध्ये प्रचाराला व्यापक आणि प्रभावी स्वरूप दिले आहे

## तांदुळवाडी येथे ग्रामदैवत सिद्धनाथ-जोगेश्वरी यात्रा संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी/ रघुनाथ देवकर :** माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी या ठिकाणी ग्रामस्थांच्या वतीने व सर्व भाविक भक्तांच्या वतीने ग्रामदैवत श्री"सिद्धनाथ-जोगेश्वरी"यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सदर यात्रेत धार्मिक कार्यक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने करण्यात आले." श्री. सिद्धनाथा-जोगेश्वरीचे" दर्शन घेण्यासाठी अनेक ठिकाणाहून भाविक भक्तांनी मोठी गर्दी



केली होती. सालाबाद प्रमाणे या यात्रेमध्ये लहान मुलांच्या खेळण्याची, पाळण्याची, त्याचप्रमाणे मिठाईच्या दुकानांची बहु गर्दी झाली होती. या यात्रेत बालकांपासून ते युवकांपर्यंत आणि युवकांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनी यात्रेचा आनंद लुटण्याचे समजते.

# राष्ट्रवादी ,उ.भा.ठा गटाला मोठा धक्का; सोयगाव पश्चिम मंडळात भाजपचा राजकीय झंझावात

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यात बनोटी सर्कल मध्ये भाजपाचा धक्का... दिनांक ३ जानेवारी रोजी सोयगाव पश्चिम मंडळात राजकीय वातावरण तापले असून राष्ट्रवादी काँग्रेस उभाठा गटाला मोठा धक्का बसला आहे. उ.भा.ठा गटातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केल्याने भाजपची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे.हा प्रवेश सोहळा राज्याचे ओबीसी कल्याण व ऊर्जा (पारंपारिक) मंत्री मा. अतुलजी साळवे मंत्री साहेब यांच्या हस्ते




पार पडला. यावेळी राज्यसभेचे खासदार व माजी मंत्री मा.भागवतजी कराड,भाजप जिल्हाध्यक्ष मा.संजयजी खंबायते,तसेच सोयगाव पश्चिम मंडळाचे अध्यक्ष सुनील भाऊ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपात प्रवेश करणाऱ्यांमध्ये मा.सभापतीचे चिरंजीव धनराज खेमराज जाधव,काशिनाथ माणिक जाधव, देवानंद धुमाळ,गोपीनाथ मोठे,सुभाष गाडे,विठ्ठल जाधव,अशोक ढमाले,बंडू विधाटे व संतोष टेलर यांचा समावेश आहे.

भाजपच्या विकासाभिमुख धोरणावर विश्वास ठेवून तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांमुळे प्रेरित होऊन हा प्रवेश झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रवेशामुळे सोयगाव पश्चिम मंडळात भाजप अधिक बळकट झाला असून आगामी निवडणुकांत भाजपची पकड अधिक मजबूत होणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

**प्रतिक्रिया – सुनील भाऊ जाधव (अध्यक्ष, सोयगाव पश्चिम मंडळ, भाजप)**

"भारतीय जनता पार्टीच्या विकासनितीवर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच मुख्यमंत्री यांच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून आज अनेक कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला आहे. सोयगाव पश्चिम मंडळात भाजप अधिक मजबूत होत असून आगामी काळात प्रत्येक गाव, प्रत्येक बूथवर भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी आम्ही सर्वजण एकजुटीने काम करू."

# खानावच्या जिंदाल कंपनीत कामगार हक्कांचा उद्रेक!

- कंपनी आवारात भारतीय मजदूर संघाचा झेंडा; किमान वेतन, पीएफ इएसआयसी, बोनससाठी संघटित संघर्ष
- खानावच्या जिंदाल कंपनीत भारतीय मजदुर युनियनची अधिकृत एंट्री; कामगार संघर्षाला नवे वळण
- योग्य मोबदला हीच आमची अंतिम मागणी - अण्णा धुमाळ

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे :** खालापूर तालुक्यातील छत्तीशी विभागातील खानाव येथील जिंदाल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत कामगारांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करत कामगारांनी भारतीय मजदूर संघाच्या वतीने संघटित संघर्षाची दिशा घेतली आहे. शासनाच्या नियमांनुसार किमान वेतन, पीएफ, इएसआयसी, बोनस व सन्मानपूर्वक न्याय मिळावा या मागणीसाठी कंपनी आवारात भारतीय मजदूर संघाची अधिकृत युनिट कमिटी स्थापन करून युनियनचा नामफलक उभारण्यात आला.

ही कमिटी भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अण्णा धुमाळ आणि जनरल सेक्रेटरी अ‍ॅड. अनिल ढुमणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झाली असून सुनील सोनवणे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यावेळी बोलताना सुनील सोनवणे यांनी सांगितले की, जिंदालसारखी ब्रॅण्डेड कंपनी आल्याने कामगारांना चांगले वेतन व सुविधा मिळतील, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात अनेक कायदेशीर हक्कांपासून





कामगार वंचित राहिले. भारतीय मजदूर संघाशी जोडल्यावरच किमान वेतन व ८ तासांचा कामकाज कालावधी लागू झाला. " याबद्दल कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे परंतू कंपनीचे हे उपकार नसून आमचे हक्क आहेत," असे देखील त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, अ‍ॅड. अनिल ढुमणे यांनी कामगार आयुक्तांकडे मध्यस्थीसाठी पत्र दिल्याची माहिती देत, गरज भासल्यास कामगार मंत्र्यांपर्यंत दाद मागण्याची भूमिका स्पष्ट केली. तर अण्णा धुमाळ यांनी संवादाला प्राधान्य देऊ; मात्र न्याय न मिळाल्यास कायदेशीर चौकटीत निर्णायक संघर्ष केला जाईल, असा इशारा देखील कंपनी व्यवस्थापनाला

> "किमान वेतन आणि ८ तास काम हा आमचा कायदेशीर हक्क आहे. तुटपुंज्या सवलती देऊन दबाव टाकण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही."
> — सुनील सोनवणे, अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ (खानाव युनिट)

> "कामगारांच्या घामाचा योग्य मोबदला मिळायलाच हवा. दाद मागण्यासाठी आम्ही कामगार आयुक्तांकडे गेलो असून, गरज पडल्यास मंत्रीस्तरावरही पाठपुरावा करू."
> — अ‍ॅड. अनिल ढुमणे, जनरल सेक्रेटरी, भारतीय मजदूर संघ

> "किमान वेतन, पीएफ, इएसआयसी, बोनस देणे हे कंपनीचे कायदेशीर कर्तव्य आहे. संवादाने प्रश्न सुटावा; अन्यथा कायदेशीर मार्गाने ठोस संघर्ष केला जाईल."
> — अण्णा धुमाळ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, भारतीय मजदूर संघ

दिला आहे. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक कामगार महासंघाचे अध्यक्ष अण्णा धुमाळ, जनरल सेक्रेटरी अ‍ॅड. अनिल ढुमणे, भारतीय मजदूर संघाचे बाळासाहेब भुजबळ, सुरेश पाटील, अर्जुन चव्हाण, अशोक निकम, डी के जोशी, बागडे पाटील, सचिन ओक, गणेश आंबवणे, सचिन कांबळे, पांडुरंग लोहार, विजय सावंत, दिनेश गायकर, संतोष नलावडे, मिलिंद भोसले, सामाजिक कार्यकर्ते तानाजी मोगारे, जितेंद्र धामणसे, जिंदाल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या युनिट कमिटीचे अध्यक्ष सुनील सोनवणे, उपाध्यक्ष लक्ष्मण पवार, शुभम चव्हाण, सचिव नितीन जाधव, सहसचिव विजय मिश्रा, खजिनदार संतोष पाटील, सहखजिनदार दिनेश दुबे यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत सावता इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सिंदखेडराजा येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्सवात साजरी

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी/अनिल ससाने :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे येथील संत सावता इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली... कार्यक्रमाचे सुरुवातीला शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा बळीराम जाधव सर यांच्या शुभहस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा बळीराम जाधव सर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले, तसेच शाळेचे प्राचार्य सुधाकर गोफने सर यांनी सुद्धा सखोल मार्गदर्शन केले, सर्व शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले, तसेच विद्यार्थ्यांना सुद्धा भाषणे केली.यावेळी शाळेच्या संचालिका सौ.जयश्री मेहेत्रे, शाळेचे सदस्य अभिजित मेहेत्रे सर शाळेचे प्राचार्य सुधाकर गोफणे सर , यांच्या सह कर्मचारी इंग्रजी विषयाचे अभ्यासक तेजराव घुगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख कु.वैष्णवी अंभोरे रुख्मिणी तौर , विज्ञान विभाग प्रमुख कु.पायल पवार , शालेय परिपाठ विभाग प्रमुख रूक्मिणी तौर, दिपाली सातपुते, संगिता खरात, मनिष बुंधेज्योती सावित्रीबाई फुले जयंती जल्लोषात साजरी करण्यात आली...

कार्यक्रमाचे सुरुवातीला शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बळीराम जाधव सर यांच्या शुभहस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले




. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा बळीराम जाधव सर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले व विद्यार्थांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या,तसेच शाळेचे प्राचार्य प्रा. सुधाकर गोफने सर यांनी सुद्धा क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर सखोल मार्गदर्शन केले , सर्व शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले, तसेच विद्यार्थ्यांना सुद्धा भाषणे केली. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेची विद्यार्थी इरफान चौधरी, तर आभाप्रदर्शन आयास चौधरी यांनी मानले

यावेळी शाळेच्या संचालिका सौ.जयश्री मेहेत्रे, शाळेचे सदस्य अभिजित मेहेत्रे सर व शाळेचे प्राचार्य प्रा.सुधाकर गोफणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सह शिक्षकेतर कर्मचारी, ज्येष्ठ शिक्षक तेजराव घुगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख कु.वैष्णवी अंभोरे रुख्मिणी तौर , विज्ञान विभाग प्रमुख कु.पायल पवार , शालेय परिपाठ विभाग प्रमुख रूक्मिणी तौर, दिपाली सातपुते, संगिता खरात, मनिष बुंधे व विद्यार्थी तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

## वावोशीचे शर्यतप्रेमी व कुस्तीप्रेमी व्यक्तिमत्त्व हरिश्चंद्र हातनोलकर यांचे निधन; रामनवमी कुस्ती स्पर्धेचे प्रमुख पंच, माजी पैलवान व सामाजिक कार्यकर्त्याला गावाचा भावपूर्ण निरोप

**दैनिक.युवक आधार प्रतिनिधी**
**खालापूर - संतोष शेवाळे :** वावोशी गावातील बैलशर्यती आणि कुस्तीची आवड जिवंत ठेवणारे, क्रीडासंस्कृतीचे जतन करणारे ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व हरिश्चंद्र हातनोलकर (वय ७९) यांचे २५ डिसेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने वावोशीसह




संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.रामनवमीच्या निमित्ताने वावोशी येथे दरवर्षी आयोजित होणाऱ्या कुस्ती स्पर्धांमध्ये रायगड जिल्ह्यासह विविध भागांतील नामवंत व गाजलेले पैलवान सहभागी होत असत. या कुस्तीच्या आखाड्यात हरिश्चंद्र हातनोलकर हे प्रमुख पंच म्हणून निष्पक्ष व जबाबदारीची भूमिका बजावत असत. त्यांच्या निर्णयांमुळे कुस्ती स्पर्धांना विशेष प्रतिष्ठा लाभली होती. हरिश्चंद्र हातनोलकर हे स्वतः पूर्वीचे पैलवान होते. त्यांनी आपल्या तारुण्यात अनेक कुस्त्यांमध्ये बाजी मारून विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले होते. त्यांच्या क्रीडाक्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. बैलशर्यतींबाबत ते विशेष शर्यतप्रेमी होते. नवीन बैलशर्यतप्रेमींना प्रोत्साहन देणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि पारंपरिक शर्यतींची शिस्त व मूल्ये जपणे यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असत. तसेच पशुधन वाढले पाहिजे, ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली पाहिजे या ठाम मताचे ते होते. या दृष्टीने तरुणांना जनावरांची निगा, संगोपन आणि जबाबदार शर्यतीबाबत ते मार्गदर्शन करीत असत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# महाराष्ट्रातील इटलीसारखे दिसणाऱ्या 'या' हिल स्टेशनला नक्की द्या भेट

**भारतात असो किंवा जगात कुठेही जेव्हा अनेकजण बाहेर फिरायला जाण्याचा विचार करतात तेव्हा प्रत्येकजण त्यांच्या आवडीच्या ठिकाणी फिरायला जात असतात. काहींना फक्त ऐतिहासिक स्थळे किंवा वास्तूंचा सदंर्भात ठिकाणी जायला आवडत् तर बहुतेक लोकं नैसर्गिक सौंदर्य आणि शांतता देणारी ठिकाणे फिरणे पसंत करतात. अशी ठिकाणे प्रत्येकासाठी आकर्षणाचे केंद्र असतात. भारतातच इतके आश्चर्यकारक नैसर्गिक सौंदर्य आहे जे परदेशांनाही मागे टाकते. विशेषत: लोकं रोजच्या धावपळीच्या ताणतणाव विसरून डोंगराळ निसर्गाच्या सानिध्यात जाऊन एखाद्या ठिकाणाला भेट देतात. त्यात तुम्हाला जर इटली सारखा देश फिरण्याचा अनुभव घ्यायचा असेल तर आता इटलीला जाण्याची आवश्यकता नाही, कारण भारतात असेच एक सुंदर ठिकाण आहे आणि ते भारताचे "मिनी इटली" म्हणून देखील ओळखले जाते. तुम्ही तिथे फिरायला जाण्याचा प्लॅन करू शकता. तर आजच्या लेखात आपण या ठिकाणी कसे जाऊ शकता योग्य वेळ कोणती आहे ते जाणून घेऊयात.**







आपण ज्या ठिकाणाबद्दल बोलत आहोत ते महाराष्ट्रात आहे. येथील अनोखे वातावरण प्रत्येक पर्यटकाला आश्चर्यचकित करते. त्याच्या रंगीबेरंगी रस्त्यांपासून ते तलावाच्या काठाच्या दृश्यांपर्यंत, असे वाटते की जणू काही तुम्ही शांतता आणि सौंदर्याने भरलेल्या दुसऱ्या जगात पोहोचला आहात. महाराष्ट्रातील हे ठिकाण कुठे आहे, तिथे कसे जायचे आणि त्याला भारताचे "मिनी इटली" का म्हटले जाते ते जाणून घेऊयात.

### महाराष्ट्रातील लवासा

महाराष्ट्रातील लवासा हे भारताचे मिनी इटली म्हणून ओळखले जाते. खरं तर हे ठिकाण इटालियन रिव्हिएरावरील पोर्टोफिनो या ठिकाणंच हे सुंदर शहर डिझाइन केले गेलेलं आहे. त्याच्या रंगीबेरंगी मेडिटेरेनियन स्टाइलच्या इमारती, तलावाच्या आसपास फिरण्यासाठी आणि दगडी रस्ते या ठिकाणाला एक अद्भुत युरोपियन वातावरण देतात. सह्याद्री टेकड्यांनी वेढलेले आणि वरसगाव तलावाच्या काठावर वसलेले, लवासा हे नैसर्गिक सौंदर्य आणि आधुनिक नियोजनाचे परिपूर्ण मिश्रण आहे, ज्यामुळे ते भारतात इटालियन शहराचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या पर्यटकांसाठी एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे.

### तलावाच्या आसपास फिरा

तुम्ही जर लवासाला भेट देत असाल तर लवासाचे हृदय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तेथील तलावाला नक्की भेट द्या. वरसगाव तलाव आणि त्याच्या रंगीबेरंगी मेडिटेरेनियन स्टाइलच्या इमारतीचे अद्भूत दृश्य पाहायला मिळते. आरामदायी शांततेत फेरफटका मारण्यासाठी, सायकलिंग करण्यासाठी किंवा फक्त तलावाच्या काठावर बसून, नैसर्गिक दृश्यांचे कौतुक करण्यासाठी आणि फोटो आणि व्हिडिओ क्लिक करण्यासाठी हे ठिकाण खूप छान आहे.

### लवासा येथील ॲडव्हेंचर खेळ

तुम्ही जर ॲडव्हेंचर प्रेमी असाल, तर हे ठिकाण तुमच्यासाठी स्वर्ग आहे. तुम्ही तलावावर जेट स्कीइंग आणि कायाकिंग सारख्या पाण्याच्या ॲक्टिव्हिटीचा आनंद घेऊ शकता. जर तुम्हाला ट्रेकिंग आणि माउंटन बाइकिंग आवडत असेल, तर टेकड्यांवर जा, जिथे तुम्हाला ॲडव्हेंचर आणि आश्चर्यकारक नैसर्गिक दृश्ये या दोन्ही गोष्टींचा आनंद घेता येईल.

### लवासामध्ये युरोपचा आस्वाद घ्या

तुम्ही तलावाकाठी असलेल्या कॅफे आणि रेस्टॉरंट्सना भेट देऊ शकता, जे युरोपियन शैलीतील वातावरणात स्वादिष्ट अन्न पदार्थ आस्वाद घेता येतो. येथे तुम्हाला वेगवेगळ्या प्रदेशातील विविध प्रकारचे पदार्थ देखील खायला मिळतील. हे फक्त जेवणापुरते मर्यादित नाही, तर नैसर्गिक दृश्ये देखील आनंददायी आहेत.

### लक्झरी रिसॉर्ट्समधील विहंगम दृश्ये


लवासा हे एक उत्साही ठिकाण आहे, जे हिरवळ आणि नैसर्गिकरित्या धुक्याने व्यापलेल्या टेकड्यांनी भरलेले आहे. त्यामुळे येथील रिसॉर्टमध्ये तुम्ही आराम करता करता किंवा फिरता फिरता असे निसर्गाचं रोमांचक दृश्ये पाहू शकता. तसेच येथील ताजी हवा तुम्हाला सकारात्मक उर्जेने भरून टाकतील. येथे लक्झरी रिसॉर्ट्स देखील आहेत, ज्यामुळे मुक्काम हा आयुष्यभराचा अनुभव बनतो, कारण ते तलाव आणि सह्याद्री पर्वतांचे नेत्रदीपक दृश्ये देतात.

### लवासाला कसे पोहोचायचे?

ऑक्टोबर ते मार्च दरम्यान भेट देणे चांगले आहे. लवासा हे महाराष्ट्रात आहे. त्यामुळे तुम्ही येथे जाण्यासाठी बाय रोड स्वत:च्या गाडीने जाऊ शकता, रेल्वे आणि विमान अशा तिन्ही मार्गाने या ठिकाणी पोहोचू शकता. लवासा येथे पोहोचण्यासाठी तुम्हाला पुण्याला जावे लागेल, जे सुमारे ५७ किलोमीटर अंतरावर आहे. ते मुंबईपासून सुमारे १९० किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणांहून तुम्ही टॅक्सी किंवा कारने प्रवास करावा, कारण वाटेतील दृश्ये मनमोहक आहेत. लवासा येथे पोहोचण्यासाठी दीड ते दोन तास लागतील. वाहतुकीसाठी तुम्ही तुमच्या सोयीनुसार ट्रेन आणि विमान यापैकी एक निवडू शकता.

# किडनीच्या विकाराने त्रस्त आहात, हे व्हिटामिन्स सुरु करा, झटपट आराम मिळवा

**किडनीची समस्या नेहमीच हळूहळू सुरु होते. सुरुवातीला याची लक्षण दिसत नाहीत. अशावेळी लोक सप्लीमेंट्सचा विचार करतात. जे किडनीचे कार्य चांगले होण्यासाठी मदत करेल, सूज कमी करेल आणि किडनीला आरोग्यदायी करेल. मात्र कोणताही सप्लीमेंट्स किडनीचा आजार ठीक करु शकत नाही. योग्य पद्धतीने आणि योग्य प्रमाणात घेतलेले काही पोषक तत्वे ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेसला कमी करणे आणि किडनीच्या कार्याला मदत करु शकतात. NIH आणि नॅशनल किडनी फाऊंडेशन संबंधी झालेल्या अभ्यासही तेच सांगत आहे.**



### व्हिटामिन्स ठरु शकते उपयोगी

टारगेटेड न्यूट्रिशनच्या ताकदीचा विचार करायचा झाला तर काही खास व्हिटामिन्स आणि एंटीऑक्सीडेंट सेल्सला होणारे नुकसान कमी करणे, डिटॉक्स प्रक्रियेसा सपोर्ट करणे आणि किडनीचे टिश्यूला पडणाऱ्या ताणापासून वाचवण्यास सहायक ठरु शकतात. या उपचाराचा पर्याय नाही.परंतू मेडीकल ट्रीटमेंटच्या सोबत हा सपोर्ट सिस्टीम सारखी काम करु शकते. व्हिटामिन्स सी ला एक मजबूत एंटीऑक्सिडेंट मानले जाते. हे किडनीच्या टीश्यूत होणारी सूज आणि ऑक्सीडेटिव्ह डॅमेजला कमी करण्यास मदत करु शकते, जे दीर्घकाळापर्यंत किडनीच्या कार्यक्षमतेला नुकसान पोहचवू शकतात. सुरक्षित प्रमाणात घेतलेले व्हिटामिन्स सी किडनीला मजबूत बनवण्यासाठी सहाय्यक होऊ शकते.


हे इम्युन सिस्टीमला सपोर्ट करते. वारंवार होणाऱ्या इन्फेक्शन उदा. युटीआय किडनीच्या समस्येला आणि बिघडवू शकते. व्हिटामिन्स सी शरीराच्या रोग प्रतिकारक क्षमतेला मजबूत करते. ज्यामुळे इन्फेक्शनचा धोका कमी होऊ शकतो आणि किडनीवर होणारा अतिरिक्त दबाव देखील घटू शकतो. किडनी सातत्याने शरीरातील टॉक्सिन्सला फिल्टर करत रहात असते. त्यामुळे फ्री रेडिकल्सपासून होणारे नुकसान येथे लवकर होऊ शकते. व्हिटामिन्स सी या हानिकारक तत्वांना समाप्त करण्यास मदत करते. ज्यामुळे किडनीवर ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस कमी होतो. आणि हळूहळू होणाऱ्या हानीचा वेग धीमा होऊ शकतो.

### या स्थितीत जपावे

किडनी स्टोनच्या प्रकरणातही व्हिटामिन्स सीची भूमिका थोडी संतुलन असणारी आहे. काही लोकांमध्ये मर्यादित प्रमाणात याचे सेवन युरिनमद्ये स्टोन तयार करणाऱ्या तत्वांना कमी करु शकते. परंतू खूप जास्त प्रमाणात व्हिटामिन्स सी घेतल्याने उलट स्टोनचा धोका वाढू शकतो. यामुळे डोस घेतना सावधानता बाळगायला हवी. खास करुन ज्या लोकांमध्ये एडव्हान्स किडनी डिसिज आहे. किंवा ज्यांच्या ऑक्सेलट स्टोन तयार होण्याची प्रवृत्ती आहे. त्यांना व्हिटामिन्स सीच्या हाय डोस पासून सावधी रहायला हवे. कोणत्याही प्रकारचे सप्लीमेंट सुरु करण्याआधी डॉक्टर वा तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा आहे. खास करुन किडनी संबंधी औषधे घेताना ही काळजी घ्यायला हवी आहे.

# स्त्री-पुरुष नात्यांमधले प्रकार

सध्या प्रचलित असलेलं नात्याचं एक नावं म्हणजे सिच्युएशनशिप. हे सध्या सर्वात जास्त चर्चेत असलेले नाते आहे. जेव्हा दोन व्यक्तींमध्ये मैत्रीपेक्षा जास्त, पण प्रेमाच्या अधिकृत कबुलीपेक्षा कमी असं नातं असतं, त्याला 'सिच्युएशनशिप' म्हणतात. या नात्याचं वैशिष्ट्य म्हणजे यात फिरणं, गप्पा मारणं आणि शारीरिक जवळीक असते, पण आपण नक्की एकमेकांचे कोण आहोत? याचे स्पष्ट उत्तर नसते. यात कोणतीही कमिटमेंट नसते. कोणतेही वचन किंवा एकमेकांसाठी काही करण्याची बांधिलकी नसते. सगळ्यांना हा प्रकार आरामदायी वाटतो, कारण जबाबदारीचं ओझं नसतं.



दुसरा प्रकार म्हणजे लिव्ह-इन रिलेशनशिप. खरंतर लग्नाआधी एकमेकांना पूर्णपणे समजून घेण्यासाठी एकत्र राहणे म्हणजे लिव्ह-इन. अनेकदा दोघांचीही लग्न झालेली असून, एकाचं लग्न झालेले असून, दोघेही घटस्फोटीत असून किंवा दोघेही विधवा किंवा विधुर असून एकमेकांच्या मानसिक, भावनिक, शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी जर एकत्र राहत असतील तर त्याला लिव्ह इन रिलेशनशिप म्हटले जाते. याचं वैशिष्ट्य म्हणजे यात जोडीदार एकाच घरात राहतात, घरखर्च शेअर करतात, दोघे नोकरी, व्यवसाय आपल्या पसंतीने करतात आणि पती-पत्नीप्रमाणे आयुष्य जगतात. यामुळे विवाहाआधी असे राहिल्यास भविष्यात लग्न करायचे की नाही, याचा निर्णय घेणे सोपे जाते, एकमेकांना ओळखायला मदत होते. अनेकदा आपल्या लग्न केलेल्या पती अथवा पत्नीला सोडून दुसऱ्याबरोबर एन्जॉय करण्यासाठी पण हा पर्याय निवडला जातो. पती-पत्नी विभक्त आहेत, पण घटस्फोट होईपर्यंत दुसऱ्या जीवनसाथीसोबत राहण्यासाठी पण हा पर्याय निवडला जातो. काहीजण तर स्वत:चे वैवाहिक आयुष्य सुरू असतानाही दुसऱ्या स्त्री अथवा पुरुषासोबत विवाहबाह्य संबंध ठेवून लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहतात.

तिसरा प्रकार म्हणजे ओपन रिलेशनशिप. या नात्यात दोन व्यक्ती एकमेकांवर प्रेम तर करतात, पण त्यांनी परस्परांना इतर व्यक्तींशी शारीरिक किंवा भावनिक संबंध ठेवण्याची मुभा दिलेली असते. यात प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. जोडीदाराला लपवून काहीही केले जात नाही, सर्व काही सहमतीने घडते. गर्ल फ्रेंड, बॉयफ्रेंड, अफेअरमध्ये असणारी जोडपे किंवा अगदी पतीपत्नी सुद्धा आजकाल ओपन रिलेशनशिपला प्राधान्य देतात. लग्नानंतर होणारे वैवाहिक वाद, मुलांवर होणारे परिणाम टाळण्यासाठी, समाजातील प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी, घटस्फोट अथवा द्वितीय विवाह टाळण्यासाठी आजकाल अनेक जोडपी आपल्या जोडीदाराला त्याला जिथे वाटेल तिथे शारीरिक संबंध ठेवण्याची परवानगी देतात. यामध्ये दोघांना पण माहिती असते की आपला जोडीदार कोणाबरोबर आहे, का आहे आणि त्यांच्यात कोणत्या पातळीपर्यंत संबंध आहेत. समजून, उमजून, ठरवून या पद्धतीने वैवाहिक नातेसंबंध टिकवले जातात.

हुक-अप कल्चर. आजकालच्या डेटिंग ॲप्समुळे हे प्रमाण वाढले आहे. यात केवळ शारीरिक आकर्षणापोटी किंवा आनंदासाठी दोन व्यक्ती एकत्र येतात. यात कोणत्याही प्रकारची भावनिक गुंतवणूक किंवा भविष्यातील बंधने नसतात. केवळ शारीरिक गरज भागविण्याच्या हेतूने, बदल अथवा मजा म्हणून हे संबंध ठेवलेले असतात. यात दोघांना एकमेकांशी पुरेशी ओळखसुद्धा नसते अथवा परत भेटू की नाही हेही निश्चित नसतं.

प्लेटॉनिक रिलेशनशिप. असे नाते जिथे दोन व्यक्तींमध्ये खूप प्रेम आणि ओढ असते, पण त्यात शारीरिक संबंधांना स्थान नसते. हे नाते पूर्णपणे मानसिक आणि आध्यात्मिक स्तरावर असते. यात निखळ मैत्री आणि एकमेकांबद्दल आदर असतो. अनेकदा विशिष्ट आध्यात्मिक संप्रदाय, समूह यातील सदस्य शिष्य या नात्याने म्हणजेच आत्मिक आणि अंतर्मनाचे मिलन होवून एकत्र आलेले दिसतात. त्यांच्यात असलेल्या नात्याला, आपुलकीला प्लेटॉनिक नाते म्हणतात.

ब्रेडक्रंबिंग आणि घोस्टिंग. नातेसंबंधातील काही नकारात्मक प्रकार आहेत. ब्रेडक्रंबिंग म्हणजे समोरच्या व्यक्तीला फक्त अधूनमधून मेसेज अथवा फोन करून आशा दाखवणे, कधीतरी भेटणे पण प्रत्यक्षात नातं पुढे न नेणे. थोडक्यात त्याला आपला होकार, नकार, प्रतिसादाचा प्रकार यावर काहीच तर्क लावता आला नाही पाहिजे असे वागवले जाते.

घोस्टिंग म्हणजे कोणतंही कारण न देता अचानक बोलणं बंद करणे आणि संपर्कातून गायब होणे. अनेकदा आपल्याशी नियमित बोलणारी, भेटणारी व्यक्ती आपल्याला टाळायला लागते, आपल्या मेसेजला, फोनला उत्तर देणे बंद करते. आपल्याला त्या व्यक्तीकडून असे वागण्याचा काहीही अर्थ सांगितला जातं नाही, अथवा कोणतेही समर्थन दिले जातं नाही. घोस्टिंग करणाऱ्या व्यक्तीला आपण कितीही आणि कोणत्याही माध्यमातून संपर्क करायचा प्रयत्न केला तरी आपल्याला कोणताही प्रतिसाद, समर्थन अथवा उत्तर मिळत नाही.

डिंक कपल संकल्पना ही अजून एक पद्धत सध्या तरुण पिढीमध्ये फोफावताना दिसते. डिंक कपल म्हणजे लग्न करायचं, एकत्र नांदायचं, भरपूर पगाराच्या नोकऱ्या करायच्या, पण मुलबाळ होऊ द्यायचे नाही. हे डिंक कपल स्वत:ला कोणत्याही जबाबदारीमध्ये अडकवू इच्छित नसतात. आपण कमावलेल्या पैशावर आयुष्य एन्जॉय करायचं, मुक्त जगायचं या भावनेतून डिंक कपल संकल्पना उदयाला आलेली आहे.

डिजीटल क्रांती टिंडर, बंबल यांसारख्या ॲप्समुळे जोडीदार शोधणे आणि बदलणे सोपे झाले आहे. वैवाहिक नात्यांमध्ये वाढत असलेला तणाव, लैंगिक तथा शारीरिक सुखं आणि समाधानाच्या अफाट कल्पना आणि अपेक्षा, उद्योग, व्यवसाय, नोकरी, शिक्षण यामुळे घराबाहेर, आपल्या गावा आणि शहराबाहेर राहावे लागण्याची परिस्थिती यातून आलेला एकटेपणा, योग्य वयात लग्न जमू न शकणे, शारीरिक गरजा आणि लग्नाचे वाढत चाललेले वय यासारख्या अनेक कारणांमुळे आजकाल नाते, भावना, एकनिष्ठपणा याची कमी झालेली किंमत, चंगळवाद यामुळे अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते.

जबाबदारीची भीती, अपेक्षांचे ओझे नको असणे, आयुष्यभरासाठी जोखीम स्वीकारायला मन तयार नसणे, यामुळे लग्नासारख्या मोठ्या जबाबदारीत अडकण्यापूर्वी लोक अनेक पर्याय पडताळून पाहू इच्छितात, अथवा लग्नानंतर पण खूप तडजोड करत बसण्यापेक्षा मिळेल तो मार्ग स्वीकारून मूव्ह ऑन होतात. आर्थिक स्वावलंबन हादेखील खूप मोठा घटक आहे, ज्यामुळे नात्यांची समीकरणं बदलत चालली आहेत. मुले आणि मुली दोघेही कमावते असल्याने कोणावरही अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य महिलांसाठी दीपस्तंभ - उंबरठाण महाविद्यालयात अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** डांग सेवा मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण येथे इंग्रजी व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

"सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असून महिलांना आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांचे विचार दिशादर्शक आहेत," असे प्रतिपादन प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ आहेर यांनी यावेळी केले.

याप्रसंगी इंग्रजी विभागप्रमुख प्रा. तुळशीराम चौधरी यांनी सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "१ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सावित्रीबाईंनी या शाळेत पहिल्या शिक्षिका म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि १८४८ ते १८५२ या अल्प काळात १८ शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाची चळवळ अधिक बळकट केली."सावित्रीबाईंच्या साहित्यिक योगदानात १८५४ मध्ये त्यांचा 'काव्यफुले' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. 'बावनकशी', 'सुबोध रत्नाकर' यांसारख्या साहित्यातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले.



तसेच १८९३ च्या सासवड येथील सत्यशोधक परिषदेचे अध्यक्षपद भूषवून त्यांनी सामाजिक चळवळीत मोलाचे योगदान दिले.

या कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ आहेर, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. तुळशीराम चौधरी, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुभाष पवार, इतिहास विभागप्रमुख प्रा. कलावती थविल, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. उमा देशमुख, मराठी विभाग सहायक प्रा. राजाराम कणसे, ग्रंथपाल मधुकर गावित, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. हेमलता महाले, इतिहास विभाग सहायक प्रा. राजेश पेटार, भूगोल विभागप्रमुख प्रा. सारिका पागी, अर्थशास्त्र विभाग सहायक प्रा. मंदिप राऊत, वाणिज्य विभाग सहायक प्रा. किशोर काळे यांच्यासह अनिल ठाकरे, अनिल कदम, हिरामण गावित, श्रीमती यशोदा गावित व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# सामाजिक बांधिलकी जपत प्रभाकर कांबळे यांचे उल्लेखनीय कार्य

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे :** पनवेल/नवी पनवेल परिसरात सामाजिक, शैक्षणिक व जनसेवेच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले कांबळे प्रभाकर शाबा हे एक परिचित व विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. वय ५० वर्षे, शिक्षण १२ वी असून व्यवसायाने धंदा करणारे प्रभाकर कांबळे यांनी आपले वैयक्तिक आयुष्य सांभाळत समाजसेवेला आयुष्याचा केंद्रबिंदू मानला आहे. त्यांचा मोबाईल क्रमांक ९७६९३५७१७१ असून ते सर्वसामान्य नागरिकांसाठी सहज उपलब्ध राहतात.

त्यांच्या कुटुंबाचाही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय वाटा आहे. त्यांच्या पत्नी सौ. अलका प्रभाकर कांबळे (वय ४८ वर्षे) या MA, B.Ed शिक्षित असून शिक्षण क्षेत्राशी जोडलेल्या आहेत. त्यांची मुलगी कु. प्रणाली प्रभाकर कांबळे (वय २७ वर्षे)



हिने LLB व LLM (London) हे उच्च शिक्षण पूर्ण केले असून पुढील पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

प्रभाकर कांबळे सध्या विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) – पनवेल महानगरपालिका जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष आहेत. तसेच भिमप्रेरणा सांस्कृतिक केंद्र, नवी पनवेल आणि भीमक्रांती सामाजिक संस्था, पनवेल या संस्थांचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. याशिवाय प्रणाली शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन म्हणून ते शैक्षणिक विकासासाठी सक्रिय आहेत.

सामाजिक कार्याचा त्यांना अनेक वर्षांचा अनुभव असून समाजातील गरजू, गरीब, अपंग, निराधार तसेच बेरोजगार युवकांसाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत. RTE अंतर्गत शाळा प्रवेशासाठी अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी प्रत्यक्ष मदत केली असून केवळ प्रवेशच नव्हे तर पुढील शैक्षणिक सहाय्य व योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्यही ते करत आहेत. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

आरोग्य सेवेतही प्रभाकर कांबळे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. स्वतःच्या खर्चाने ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध करून त्यांनी अनेक रुग्णांना वेळेवर मदत केली आहे. अनेक वर्षांपासून रक्तदान शिबिरे आयोजित करून गरजू रुग्णांना रक्तपुरवठा केला आहे. कोविड-१९ सारख्या महामारीच्या कठीण काळात स्वतःच्या वाहनातून अनेक रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्याची व्यवस्था त्यांनी केली, हे कार्य समाजाने विशेषत्वाने दखल घेण्यासारखे आहे.

उद्योगधंद्यांविषयी मार्गदर्शन करणे, महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करणे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे हे कार्यही ते सातत्याने करत आहेत. गरीब व मागासवर्गीय लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय मिळवून देणे, शैक्षणिक प्रगतीसाठी योगदान देणे आणि जनसेवेतून समाजाचा सर्वांगीण विकास साधणे हेच आपले मुख्य ध्येय असल्याचे प्रभाकर कांबळे सांगतात.

निस्वार्थ सेवा, स्पष्ट विचार आणि समाजहिताची तळमळ यामुळे प्रभाकर कांबळे हे पनवेल परिसरातील जनतेत आदराचे स्थान मिळवत असून त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# घोटा येथे जि.प.प्राथमिक मराठी शाळेत बालआनंद मेळावा उत्साहात..!!

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** तालुक्यातील घोटा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे 3 जानेवारी रोजी आयोजित केलेला खाद्य महोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला आहे.

येथील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची खरेदी पालकासह या महाउत्सवासाठी आमंत्रित केलेल्या पाहुण्यांनी केली असून याचा आस्वादही



घेतला आहे. विद्यार्थ्यांना खऱ्या कमाईचा मार्ग कळावा या मागचा उद्देश आहे. यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे पालक, व सरपंच अनिल मोरे, तसेच उपसरपंच,सर्व ग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक सुधीर सरकटे सर, शिक्षक कैलास हेंबाडे, शिक्षक तानाजी बिल्लारी, किशोर मोरे, डॉ.गजानन मोरे, सुनिल मोरे, संदिप मोरे ग्रा.प.सदस्य, अंबादास कांबळे ग्रा.प.सदस्य, रामेश्वर बेंद्रे उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती घोटा, निलेश मोरे, गजानन अवचार,अमोल देशमुख, संदीप अवचार, वसंतराव मोरे, ओम लोखंडे, सुभाष वाघमारे,व तसेच सर्व शिक्षक रुंद व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भानुदास मोरे, व शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष व सर्व सदस्य, पोलीस पाटील, पालक व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यांच्यासह शिक्षक कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

या महोत्सवात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉल मार्फत विद्यार्थ्यांनी पाणीपुरी,भेळ, लाडू चिवडा, वडे,मिसळ, पोहे,पोगे, अशी विविध खाद्यपदार्थांची विक्री केली.

# प्रशंसा भोयर यांची भारतीय जनता युवा मोर्चा नागपूर महानगर 'युवती प्रमुख' पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** भारतीय जनता युवा मोर्चा, नागपूर महानगरच्या 'युवती प्रमुख' पदी कु.प्रशंसा भोयर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप शहराध्यक्ष मा. दयाशंकरजी तिवारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि युवा मोर्चा शहर अध्यक्ष सचिन करारे यांच्या नेतृत्वात ही घोषणा करण्यात आली.प्रशंसा भोयर यांचा संघटनेतील अनुभव आणि कार्यकुशलता लक्षात घेऊन ही जबाबदारी त्यांना सोपवण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी दक्षिण-पश्चिम मंडळ विधी आघाडीचे प्रसिद्धी प्रमुख, तसेच दक्षिण-पश्चिम मंडळ आणि त्रिमूर्ती नगर मंडळ येथे युवती प्रमुख म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम पाहिले आहे.या



नियुक्तीबद्दल बोलताना मान्यवरांनी विश्वास व्यक्त केला की, प्रशंसा भोयर यांच्या निवडीमुळे नागपूर शहरातील युवतींचे संघटन अधिक मजबूत होईल. याप्रसंगी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि त्यांच्या भावी राजकीय प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या

# भाजपकडून बंडखोर उमेदवारांचे सहा वर्षांसाठी केले निलंबन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या खारघरमधील अधिकृत उमेदवारांविरोधात उमेदवारी अर्ज दाखल करून पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल निलेश बाविस्कर, गीता चौधरी व कोमल शिंदे- दहाडे यांचे भारतीय जनता पार्टीमधून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे. संबंधितांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवत बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टी ही शिस्तबद्ध संघटना असून, पक्षाच्या निर्णयांचे पालन करणे प्रत्येक कार्यकर्त्याला बंधनकारक आहे. मात्र निलेश बाविस्कर, गीता चौधरी आणि कोमल शिंदे-दहाडे यांनी स्वतःच्या स्वार्थापोटी निर्णय घेत भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात आपले उमेदवारी अर्ज दाखल करत पक्षशिस्तीचा भंग आणि बंडखोरी केली आहे. त्यामुळे निलेश बाविस्कर, गीता चौधरी व कोमल शिंदे-दहाडे यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# दाढ बु येथे श्रद्धा ग्रामविकास प्रतिष्ठानतर्फे भव्य संगीतमय देवी भागवत कथा व साई सच्चरित पारायण सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**लोणी (वार्ताहर) :** श्रद्धा ग्रामविकास प्रतिष्ठान, दाढ बु यांच्या वतीने आयोजित श्री साई सच्चरित पारायण, सन्मान नारीशक्तीचा आणि भव्य संगीतमय देवी भागवत कथा निरुपण सोहळा ह.भ.प. साध्वी सोनालीताई करपे यांच्या सुमधूर वाणीतून दि. २५ डिसेंबर २०२५ ते ०१ जानेवारी २०२६ या कालावधीत अत्यंत भक्तिमय व उत्साही वातावरणात संपन्न झाला. सप्ताहाची सांगता ०१ जानेवारी रोजी काल्याच्या कीर्तनाने झाली.

परममंगलमय, जीवाचे परमकल्याण साधणारी, साधकाला भक्ती-सुखात न्हाऊ घालणारी तसेच भुक्ती-मुक्ती प्रदान करणारी पवित्र श्रीमद् देवी भागवत कथा ऐकण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कथाकथनाच्या माध्यमातून साध्वी सोनालीताई करपे यांनी देवीमहात्म्याचे सखोल, प्रेरणादायी व हृदयस्पर्शी निरुपण केले.

या सप्ताह कालावधीत अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मा. शालिनीताई विखे पाटील यांनी उपस्थित राहून कथा श्रवणाचा आनंद घेत भाविकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

श्रद्धा ग्रामविकास प्रतिष्ठान गेल्या १७ वर्षांपासून सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. यामध्ये रक्तदान शिबिरे, सर्वरोग निदान व महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, महिलांचे कर्करोग तपासणी व मार्गदर्शन, पाणीटंचाई काळात टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा, मोफत बोअरवेल, शाळांमध्ये एलईडी स्क्रीन, इन्व्हर्टर, पेव्हर ब्लॉक, विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप, कोरोना काळात कोविड सेंटरला आर्थिक मदत, किराणा किट वाटप, औषध फवारणी तसेच नवरात्रोत्सवात सुमारे ८०० महिलांसाठी मोफत दर्शन सहलीचे आयोजन आदी उपक्रमांचा समावेश आहे.सप्ताहादरम्यान दाढ बु गावातील सर्व युवक मंडळे व



तरुणांनी श्रमदानातून महाप्रसादाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. पंगतीनंतर स्वच्छतेचे काम श्री गणेश व दिनेश आरणे यांनी प्रामाणिकपणे केले. आठ दिवस स्वादिष्ट महाप्रसाद तयार करण्याचे कार्य श्री रविंद्र अण्णा बनसोडे, श्री गणेश बनसोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या केले. महात्मा फुले विद्यालयाचे विद्यार्थी व सर्व युवक मंडळांनी महाप्रसाद वाटपात सक्रिय सहभाग घेतला.

काल्याच्या कीर्तनानंतर उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल युवा उद्योजक मा. श्री शुभमजी पारख (शिर्डी) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या सप्ताह सोहळ्यास सहकार्य करणारे भाविक, युवक मंडळे, भजनी मंडळे, दानशूर देणगीदार, अन्नदाते, भाकरी बनविणाऱ्या महिला भगिनी, शालेय विद्यार्थी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सर्व सहकारी यांचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांनी आभार मानले.

# ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेची सावित्रीबाई फुलेंना अनोखी मानवंदना, ग्राम पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ग्राममित्र प्रशिक्षणाची सुरुवात.!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** बांधणवाडी-पनवेल येथील ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने ४ जानेवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्राम पातळीवर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी "ग्राममित्र प्रशिक्षणाची" सुरुवात करून सावित्रीबाई फुलेंना अनोखी मानवंदना दिली आहे. ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या बांधणवाडी येथील कार्यालयात संपन्न झालेल्या या प्रशिक्षणाचे उद्धाटन ज्येष्ठ पत्रकार सुवर्णा दिवेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या प्रशिक्षणात ग्राम स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत, महसूल, ग्रामविकास, पोलीस, वनविभाग, माहिती अधिकार, आरोग्य यंत्रणा या



शासकीय आणि प्रशासकीय यंत्रणांविषयी माहिती देण्यात येणार आहे. तसेच लेखन, वक्तृत्व, नेतृत्व, संवादकौशल्य यांचेही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्रामस्तरावर काम करणारा कार्यकर्ता घडावा या हेतूने ग्राममित्र प्रशिक्षणाची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रशिक्षणात रायगड भूषण संतोष ठाकूर, अध्यक्ष-ग्राम संवर्धन सामाजिक संस्था, उदय गावंड, सामाजिक कार्यकर्ते आणि राजेश रसाळ, समन्वयक- ग्राममित्र हे प्रशिक्षण देणार आहेत. तसेच ३३ ग्राममित्र प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत. ग्राममित्र प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्याचा असून प्रत्येक रविवारी हे प्रशिक्षण होणार आहे. समाजासाठी झटणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्राम स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ग्राममित्र प्रशिक्षणाचे उदघाटन करून अनोखी आदरांजली वाहण्यात आली. उद्धाटन सत्रामध्ये सहभागी कार्यकर्त्यांना आदर्श गाव संकल्पनेविषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार, श्रीमती.सुवर्णा दिवेकर यांनी सावित्रीबाईंच्या आदर्श लक्षात घेता समाज विकासाच्या या कार्यक्रमात महिलांनी सर्वाधिक सहभाग घ्यावा असे आवाहन करीत सदर प्रशिक्षण दरम्यान किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी कोणत्याही शासकीय कार्यालयात कामासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

सदर उद्धाटन सत्राचे प्रास्ताविक ग्राममित्रचे समन्वयक राजेश रसाळ यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की सध्या गाव पातळीवर राजकीय पुढारी आणि कार्यकर्त्यांची मक्तेदारी असल्यासारखे वातावरण असल्यामुळे ज्याची सरशी त्याची खुर्ची अशा पद्धतीने गावांमध्ये विविध गटतट निर्माण होत आहेत ज्यामुळे गावाचा सर्वसमावेशक पद्धतीचा विकास होताना दिसत नाही त्यामुळे ग्राममित्रच्या प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी गावातील ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करतील असा विश्वास वाटतो. म्हणून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणात सहभागी व्हावे असे आवाहन ठाकूर यांनी यावेळी केले.

यावेळी रुपेश कदम, ॲड.समीर भालेकर उमेद अभियान प्रभाग समन्वयक भावना पाटील, पाणलोट क्षेत्र विकास तज्ञ श्रीकांत म्हात्रे, पत्रकार कैलासराजे घरत, अजय भोईर, सचिन गावंड आदी मान्यवर उपस्थित होते. तर प्रशिक्षण समन्वयक राजेश रसाळ, राजू पाटील, सचिन पाटील, रणजीत पाटील यांनी ह्या प्रशिक्षणाचे व्यवस्थापन केले.

# पौष–माघ पौर्णिमेचा पारधी उत्सव भक्तिभावात साजरा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी / अनिकेत मोहित :** पौष पौर्णिमेला देव पारधीला जाण्याची आणि माघ पौर्णिमेला पारंपारिक व श्रद्धेची परंपरा यंदाही मोठ्या भक्तिभावात पार पडली. पौष पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी ठीक सहा वाजता भैरवनाथ मंदिरातून देवाची पालखी विधीवत निघाली. पारंपरिक ढोलाच्या गजरात आणि भक्तांच्या उपस्थितीत पालखी मानकरी कुटुंबांच्या घरी नेण्यात आली.

पालखी मार्गक्रमण करत असताना अनेक मानकऱ्यांच्या घरी पालखी उतरवण्यात आली. दारोदारी नागरिकांनी देवाची आरती करून प्रार्थना केली. नवस-नवसाची माहिती सांगून देवाची विधीपूर्वक पूजा



करण्यात आली. मानपानाची परंपरा जपली गेली आणि उपस्थित भक्तमंडळींसाठी चहापानाची व्यवस्था करण्यात आली.संपूर्ण मार्ग फिरून झाल्यानंतर साळीवाडा विभागातून पालखी डोंगरावर नेण्यात आली. तेथे देवाचे प्राचीन स्थान असून त्या ठिकाणी पालखी स्थिरावली. देवाची 'खुण' म्हणून मोराचे पीस त्या स्थानी ठेवण्यात येते अशी परंपरा आहे. त्यानंतर रात्री सुमारे एक ते दीडच्या सुमारास पालखी पुन्हा भैरवनाथ मंदिरात परत आली.

माघ पौर्णिमेच्या दिवशी पुन्हा त्या स्थानी जाऊन देवाला परत आणण्याचा विधी पार पडणार आहे पालखी निघाल्यानंतर साळीवाड्यातून मार्गक्रमण करत नागरिकांच्या आरत्या स्वीकारत पेशवे आळी येथे आगमन होऊन देवाचे मानकरी असलेल्या कुटुंबांकडे पालखी उतरवून देवाचा मानपान करतील आणि तेथे देवाला नैवेद्य अर्पण करून पारंपरिक पद्धतीने देवाला चिलीम दाखवण्यात येईल. श्रद्धा, परंपरा आणि भक्तिभावाने नटलेला देवाच्या पारधीला जाण्याचा उत्सव शांतता आणि उत्साहात संपन्न झाला आणि त्याच उत्साहात देव पारधीवरून येण्याचा उत्सव ही साजरा केला जाईल.

# एरंडोल महाविद्यालयात मासिक पाळी संदर्भात मार्गदर्शन आणि सॅनिटरी पॅडचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** एरंडोल येथील दादासाहेब दिगंबर शंकर पाटील महाविद्यालयात महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान अंतर्गत युवती सभा मंच आणि सोफी सॅनिटरी पॅड कंपनीच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थीनींसाठी मासिक पाळी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

युवती सभा सचिव डॉ. रेखा साळुंखे आणि सोफी सॅनिटरी पॅड कंपनीच्या प्रतिनिधी सिमीरन कौर तसेच सोनिया कुमार यांनी उपस्थित विद्यार्थिनींशी मासिक पाळी दरम्यान होणारे शारीरिक व मानसिक त्रास आणि पीसीओडी या समस्यांविषयी व त्यावरील उपाययोजना याविषयी माहिती दिली आणि हितगुज केले.

त्याचबरोबर महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनींच्या सोयीसाठी उपलब्ध सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन आणि डिस्पोजल मशीन यांच्या बाबतही सविस्तर माहिती देऊन त्याचा वापर कसा करावा याचे उपस्थित विद्यार्थिनींना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर सर्व विद्यार्थिनींना सोफी सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करण्यात आले.




याचा लाभ वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालय तसेच जिजामाता माध्यमिक विद्यालयातील २५८ विद्यार्थिनींनी घेतला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. अमितदादा पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. अरविंद बडगुजर, कनिष्ठ महाविद्यलयाचे उपप्राचार्य श्री. गायकवाड, मुख्याद्यापक श्री. केदार श्री. शेखर पाटील, श्री. नितीन पाटील यांनी कार्यक्रमाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच डॉ. स्वाती शेलार, डॉ. मीना काळे, डॉ. शर्मिला गाडगे, डॉ. सविता पाटील, मीना सोनावणे, राजश्री पाटील, मनीषा बाविस्कर, पल्लवी पाटील, जयश्री देशमुख, सपना पाटील, लता अढळकर, समिता पाटील, पूनम वाघ, संजय भदाणे, सर्जेराव खैरनार आणि सुनील पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# स्वस्त धान्य वाटप मध्ये गोंधळ : अनेक पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित

## धर्माबाद मध्ये राशन व्यवस्थेचा बोजवारा

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सुर्यकार :** धर्माबाद तालुक्यात शासनाकडून गोरगरीब जनतेसाठी मोफत धान्य पुरवठा केला जात असला, तरी पुरवठा विभागाच्या निष्क्रियता व संगनमतामुळे प्रत्यक्षात अनेक पात्र लाभार्थ्यांच्या तोंडचे धान्य पळवले जात आहे. कागदावर योजना चालू असताना वास्तवात मात्र गरिबांची थेट लूट सुरू असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.स्वस्त धान्य वितरण व्यवस्था पारदर्शक राहावी, यासाठी शासनाने ई-पॉस मशीनद्वारेच रेशन वाटपाचे सक्तीचे आदेश दिले आहेत. मात्र धर्माबाद तालुक्यात हे आदेश सर्रास धाब्यावर बसवले जात असून, दर दोन महिन्यांतून एकदाच लाभार्थ्यांचा अंगठा घेऊन मधल्या महिन्याचे धान्य गिळंकृत




केले जात आहे. शासन दरमहा धान्य पुरवठा करत असतानाही एक महिना गॅप करून त्या महिन्याचे धान्य गायब केले जाते, हा प्रकार उघड भ्रष्टाचारास खतपाणी घालणारा आहे.

गेल्या संपूर्ण वर्षभरात तालुक्यात एकदाही ई-पॉस मशीनमार्फत १०० टक्के धान्य वाटप झाले नाही, ही बाब गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे. हा सगळा प्रकार म्हणजे पुरवठा विभागातील अधिकारी व दुकानदारांच्या संगनमताने चालवलेला भ्रष्टाचाराचा खेळ नाही तर काय? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

वेळेवर धान्य वाटप न करणे, स्वस्त धान्य दुकानात तक्रार नोंदवही न ठेवणे, लाभार्थ्यांची यादी न लावणे, किती धान्य मिळाले याची पावती न देणे, 'पावती निघत नाही' या कारणावरून धान्य कमी देणे, 'पुढच्या महिन्यात या' म्हणून लोकांना हुसकावणे, मर्जीतल्या दुकानदाराला दोन दुकाने संलग्न देणे, प्रत्येक दुकानासमोर मर्जीतील व्यापारी बसवणे, दुकानाचे वेळापत्रक न लावणे, दुकान फक्त एक-दोन दिवसच सुरू ठेवणे, तसेच धान्य वेळेवर येऊनही २० ते २५ दिवस वाटपात मुद्दाम विलंब करणे— हे सर्व प्रकार म्हणजे गरिबांच्या हक्कावरचा उघड डल्ला आहे.

तालुक्यातील गोरगरीबांचे धान्य वाटप न करता काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या स्वस्त धान्य दुकान चालकांचे परवाने तात्काळ रद्द करण्यात यावेत, तसेच या संपूर्ण गैरप्रकाराला जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी जनतेतून होत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, एक वर्षापूर्वी नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पवार यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र पाठवून लेखी उत्तर मागितले होते. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या पथकाने शासकीय धान्य गोदामावर धाड टाकून पंचनामा केला. मात्र त्यानंतर हे प्रकरण थंड बस्त्यात टाकले गेले की जाणीवपूर्वक दाबले गेले, असा गंभीर संशय आता जनतेतून व्यक्त होत आहे.

# ग्वालियर घटनेविरोधात आक्रमक पवित्रा: दोषींवर NSA लावा, अन्यथा भीम आर्मी व आजाद समाज पार्टी कां राज्यभर रस्त्यावर उतरणार

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड :** मध्यप्रदेशातील ग्वालियर येथे संविधान निर्माते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचा अपमान करून त्यांचा फोटो जाळण्यात आल्याच्या घटनेचा आजाद समाज पार्टी (कां.) व भीम आर्मी यांच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम (NSA Act) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी राष्ट्रपती महोदयांकडे करण्यात आली आहे.



या संदर्भात आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हाध्यक्ष यवतमाळ राजकुमार भगत व भीम आर्मी यवतमाळ जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव यांच्या वतीने राष्ट्रपती महोदयांना उपविभागीय अधिकारी पुसद यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार असून कोट्यवधी वंचित, शोषित व बहुजन समाजाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या प्रतिमेचा अपमान करणे म्हणजे भारतीय संविधान, लोकशाही व समतेच्या मूल्यांवर थेट हल्ला असून, या घटनेमुळे संपूर्ण देशातील आंबेडकरवादी समाजाच्या भावना तीव्रपणे दुखावल्या आहेत. तसेच समाजात तेढ व अशांतता निर्माण होण्याची गंभीर शक्यता आहे.

या घटनेत सहभागी असलेल्या सर्व आरोपींवर NSA Act अंतर्गत तत्काळ, कठोर व उदाहरणार्थ कारवाई करावी. सामान्य कायद्यांतर्गत कारवाई अपुरी असून, समाजविघातक प्रवृत्तीला वेळीच चाप लावणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच मागण्यांची तात्काळ पूर्तता न झाल्यास आजाद समाज पार्टी (कां.) व भीम आर्मीच्या वतीने महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यभर तसेच देशभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा कडक इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस संपूर्णपणे संबंधित प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी भीम आर्मी जिल्हाध्यक्ष यवतमाळ अशोक भालेराव, आजाद समाज पार्टी कां. युवा जिल्हाध्यक्ष यवतमाळ राजकुमार भगत, भीम आर्मी पुसद तालुका उपाध्यक्ष वैभव सूर्यवंशी, राहुल धुळे, शांतीशील जाधव उपस्थित होते.

# पोलिसांनी साधला शालेय विद्यार्थ्यांशी संवाद

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार :** शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात क्रांतीज्योती ,पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त (०३ जानेवारी) शनिवार रोजी विवेकानंद विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी स्वामी विवेकानंद व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा घायवट,दामिनी पथक प्रमुख अस्मिता मोरे , शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी ,मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे ,अनिल कौसडीकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कृष्णा घायवट यांनी विद्यार्थ्यांना पोलीस कायदे ,कलम ,महिला अत्याचार ,सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजावून सांगितले.अस्मिता मोरे यांनी विद्यार्थिनींशी संवाद




साधताना स्वरक्षण व जागरूकता याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींना समाजातील धोके व त्यावरील उपाय योजनांची माहिती देण्यात आली. विद्यार्थिनींनी मनमोकळया मनाने प्रश्न विचारले त्यावर समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव एकशिंगे यांनी केले.पद्य सोनाली जोशी यांनी सादर केले. सूत्रसंचालन स्वप्नाली देवडे तर आभार विजय चौधरी यांनी मानले.

# बाळदी येथे हरभरा शेती शाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजू गायकवाड :** उमरखेड तालुक्यातील पारधी येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग तालुका कृषी अधिकारी, उमरखेड यांच्या वतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत हरभरा पिकावरील शेती शाळेचे आयोजन बाळदी येथे करण्यात आले होते. सदर शेती शाळेचा कार्यक्रम हरभरा पिकावरील संवेदनशील वाढीच्या अवस्थेनुसार घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांना शेती शाळेच्या माध्यमातून कमी खर्चाचे आधुनिक तंत्रज्ञान देण्यात येत आहे. सदर कार्यक्रम प्रसंगी श्री प्रकाश



पवार सहाय्यक कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना हरभरा पिकावरील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन व्यवस्थापन बाबत प्रात्यक्षिकाद्वारे पीक परिसंस्थेचे निरीक्षण घेऊन माहिती सांगितली. तसेच बाळदी येथील सहाय्यक कृषी अधिकारी श्री शिवाजी परतवाड यांनी घाटे अळी चे जीवनक्रम व एकात्मिक कीड व्यवस्थापन विशेषतः कामगंध सापळ्याचा वापर व पक्षी थांबे, सापळा पिके तसेच महा कृषी विस्तार ॲप, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, महाडीबीटी, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना व इतर विविध योजने विषयी सविस्तर माहिती सांगितली.

सदर शेती शाळेला गावातील शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हरभरा पिकाच्या लागवडी संदर्भात कमी खर्चावरील तंत्रज्ञान अवगत केले. तसेच श्री गणपत कोटकर समूह सहायक यांनी पोखरा योजनेतील विविध घटक तुषार, फळबाग, शेडनेट हाऊस, रेशीम उद्योग शेतीमाल प्रक्रिया उद्योग गट शेती सेंद्रिय शेती बाबत शेतकऱ्यांना माहिती दिली.

सदर शेती शाळा प्रसंगी श्री भगवान बोरकर सरपंच, अंकुश मिराशे उपसरपंच, दीपक हरण, लिंबाजी गायके, अमोल मिराशे, बाळासाहेब भोसले, विठ्ठलराव भोसले, मनोज शिरडकर, रामराव वटाणे, विनोद चिरडे, सतीश दुधे, इत्यादी शेतकरी बांधव व पदाधिकारी उपस्थित होते.

# महार वतन जमिनी मूळ मालकांना द्या; अन्यथा भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां) यांचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/राजू गायकवाड :** महार वतन व महार वतन गायरान जमिनींवरील बेकायदेशीर अतिक्रमण हटवून त्या जमिनी मूळ हक्कधारकांना देण्यात याव्यात, या मागणीसाठी भीम आर्मी भारत एकता मिशन यवतमाळ जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव व आजाद समाज पार्टीचे पदाधिकारी राजकुमार भगत यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री मा. चंद्रकांत बावनकुळे यांना तहसीलदार पुसद यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.



राज्यात साडेपाच लाख एकर महार वतन जमीन असून त्यांना ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी आहे. मात्र अनेक ठिकाणी प्रस्थापित धनदांडगे व राजकीय वरदहस्त असलेल्या व्यक्तींनी या जमिनी बेकायदेशीररीत्या हडप केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या जमिनींवर उद्योग, कंपन्या व शैक्षणिक संस्था उभारण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले.

महार वतन जमिनींची बेकायदेशीर खरेदी-विक्री व विल्हेवाट थांबवून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, तसेच संपूर्ण राज्यात या जमिनींचे विशेष सर्वेक्षण करून श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां) वतीने देण्यात आला. यावेळी अशोक भालेराव भीम आर्मी यवतमाळ जिल्हाध्यक्ष, राजकुमार भगत आजाद समाज पार्टी (कां) युवा जिल्हाध्यक्ष यवतमाळ, वैभव सूर्यवंशी भीम आर्मी पुसद तालुका उपाध्यक्ष, राहुल धुळे,करण खंदारे, अनिल कांबळे,अश्विन कांबळे, ईश्वर जाधव उपस्थित होते.

# प्रत्येक विध्यार्थ्यांमध्ये एक कला दडलेली असती - व्यंगचित्रकार शिवाजी गावडे यांचे मत

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** प्रत्येक मुलामध्ये एक कला दडलेले असून आपल्याला कोणती कला आवडते याची ओळख विद्यार्थ्यांनी करून घेतली पाहिजे व आपल्यामध्ये असलेल्या कलेला रोज थोडा वेळ दिला पाहिजे, सध्याच्या youtube च्या जमान्यात अनेक विविध कला आपल्या दारामध्ये येऊन ठेपले आहेत त्याचा फायदा घेऊन आपल्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये कलागुण जोपासणे अत्यंत गरजेचे आहे,कलेमुळे मन प्रसन्न राहते व आपले आरोग्य टिकून राहते. समाजामध्ये कला नसती तर अतिरेकी विचारांनी थैमान घातले असते. जो समाज कला सक्त असतो त्या समाजातील लोक गुन्या-- गोविंदाने नांदत असतात खऱ्या कलाकारांमध्ये जात -धर्म, लहान- मोठा, स्त्री -पुरुष, गरीब -श्रीमंत असे कोणतेही भेदभाव नसतात.-- असे विचार प्रसिद्ध व्यंगचित्रकार व्याख्याते शिवाजी गावडे यांनी मांडले.ते श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालय



भवानीनगरच्या उदमायवाडी तालुका इंदापूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या समोर ' कला हेच जीवन ' या विषयावर आपली मते मांडत होते. ते पुढे म्हणाले विद्यार्थ्यांनी आपल्यातील कला ओळखून ती विकसित केली तर त्यांचे जीवन समृद्ध होईल,त्यांनी व्यंगचित्र कलेचे प्रात्यक्षिक सादर केले.यावेळी प्राचार्या शिवाली माने देशमुख कार्यक्रम अधिकारी प्रा. अस्मिता चांदगुडे प्रा बाबासाहेब चव्हाण प्रा. रणसिंग मॅडम प्रा.सोनाली वाघमारे कार्यालयीन अधीक्षक सुशील निंबाळकर रविंद्र सुतार उपस्थित होते.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दुरदृष्टीतून ग्रामीण भागाला विशेषतः शेतक-यांच्या आर्थिक प्रगतीला सहाय्यभूत ठरणारी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना साकारण्यात आली आहे. या योजनेतून शेतक-यांना आपला शेतमाल बाजारपेठेत वेळेत पोहोचविता येईल. बारमाही शेतरस्त्यांची उपलब्धता ही ग्रामीण अर्थकारणाला चालना देणारी असून ही योजना राज्याच्या प्रत्येक ग्रामीण भागात प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असून स्थानिक अधिका-यांनी दक्षता घेण्याचे प्रतिपादन वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशीष जयस्वाल यांनी केले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी जिल्हाधिकारी, डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह राज्यभरातील संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते.

पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वर्षांपासून शेतकरी पाणंद रस्त्यांच्या चिंतेत असतात. त्यांच्यासाठी रस्त्यांची सुविधा केवळ वाहतूकीपुरती मर्यादित नसून शेतमाल जर वेळेवर बाजारपेठेत पोहोचला तर त्याचे मिळणारे मोल हे त्यांच्या अर्थकारणाशी निगडीत असते. शेती व शेतक-यांच्या अर्थकारणाला गती देण्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्वाची असल्याचे वित्त राज्यमंत्री




ॲड. आशीष जयस्वाल यावेळी म्हणाले.

ग्रामीण भागात शेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या शेतक-यांपासून महानगराच्या विस्तारापर्यंत महसूल विभागाला आपली कर्तव्ये पार पाडावी लागतात. यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही शेतक-यांच्या उज्वल भवितव्याला अधोरेखित करणारी असल्याने या कामातील गुणवत्ता ही त्या त्या भागातील भौगोलिक रचनेनुसार सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक अधिका-यांनी आपल्या भागात असलेला जमिनीचा पोत व पाणंद रस्त्याची मजबुती कशी गुणवत्तापूर्ण करता येईल याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. यासाठी गरजेप्रमाणे आवश्यक तेथे योग्य त्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचे निर्देश अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी महसूल विभागातील वरिष्ठ अधिका-यांना दिले. त्यांनी दुरदृश्यप्रणालीद्वारे अधिका-यांना मार्गदर्शन केले.

शेती आणि शेतकऱ्यांना जोडणारा दुवा म्हणजे पाणंद रस्ता आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या योजनेची सखोल माहिती व्हावी, याची अंमलबजावणी करताना अधिका-यांच्या मनात कोणेतही संदेह राहू नयेत, या योजनेबाबत अकारण पत्रव्यवहार करण्यात वेळ जाऊ नये या दृष्टिकोनातून सारासार विचार करून हे प्रशिक्षण आपण आयोजित केल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

# मातेरेवाडीच्या विद्यार्थ्यांची केंद्रस्तरीय अध्यक्ष चषक स्पर्धेत घवघवीत कामगिरी

### मानवाडा केंद्रात गुणवत्तेचा डंका ; विविध स्पर्धांत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांची कमाई

**दैनिक युवक आधार**

**कृष्णा गायकवाड/पिंपळगाव बसवंत :** मातेरेवाडी (ता. दिंडोरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मातेरेवाडी या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मानवाडा केंद्रस्तरीय अध्यक्ष चषक स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. शैक्षणिक गुणवत्ता, कला, क्रीडा व वक्तृत्व अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी आपली चमकदार कामगिरी सिद्ध केली.

सामाजिक कार्यकर्ते विक्रांत आप्पा सूर्यवंशी यांनी दिलेल्या अधिक माहिती नुसार.

या स्पर्धेत समूहगीत या प्रकारात शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात वैष्णवी शंकर शेक्रे हिने उत्कृष्ट धाव घेऊन प्रथम क्रमांक मिळवत केंद्रस्तरीय स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले.वक्तृत्व स्पर्धेत श्रेया राजेंद्र गायकवाड हिने प्रभावी मांडणी करत द्वितीय क्रमांक मिळवला. तर वैयक्तिक नृत्य या कला प्रकारात श्रेया माणिक हांडगे हिने सादरीकरणातून परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांक प्राप्त केला.संगीत व



चित्रकलेतही शाळेच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली. वैयक्तिक गायन स्पर्धेत स्वरा नितीन दुगजे हिने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच चित्रकला स्पर्धेत वैष्णवी शंकर रोक्रे हिने तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत श्रेया माणिक हांडगे हिने तृतीय क्रमांक मिळवून आपली बहुआयामी गुणवत्ता सिद्ध केली.या सर्व यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून, त्यांच्या या घडामोडींमागे शाळेतील सर्व शिक्षकवृंदांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा व विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. मातेरेवाडी शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विकासकामांच्या जोरावर पनवेल महापालिकेवर महायुतीचा मोठा विजय होणार – अरुणशेठ भगत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल परिसराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे पूर्ण झाली. ही कामे जनतेपर्यंत पोहचवणे कार्यकर्त्यांची मुख्य जबाबदारी आहे. विकासकामांच्या जोरावर आपण जनतेपुढे जात असून महापालिका निवडणूक मोठ्या विजयाने जिंकू, असा विश्वास भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी प्रभाग क्रमांक ०१ मध्ये व्यक्त केला. पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत भाजप, शिवसेना,



राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीचे प्रभाग क्रमांक ०१ मधील उमेदवार विजयश्री संतोष पाटील, लीना नंदकुमार म्हात्रे, नितेश बाळकृष्ण पाटील आणि संतोष बाबुराव भोईर यांच्या प्रचाराचा शुभारंभ भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते धानसर येथे श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. यानिमित्ताने आयोजित प्रचार रॅलीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रॅलीत कार्यकर्त्यांचा ताफा सहभागी झाला होता. ठिकठिकाणी महिलांनी उमेदवारांचे औक्षण करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या. भाजप नेते अरुणशेठ भगत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत भाजप महायुतीचे सहा उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. ही तर फक्त सुरुवात आहे, पिक्चर अभी बाकी आहे. पुढे त्यांनी आपला विजय निश्चित असला तरी गाफील न राहता पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने कामाला लागा आणि प्रत्येक मतदारापर्यंत पोहचून प्रचार करा, असे सूचित केले. भाजपचे तालुका उपाध्यक्ष सुरेश पोरजी, प्रभाग १ सरचिटणीस जितेंद्र पोरजी, राजेश तांबोळी, काळुराम गोंधळी, विष्णू पोरजी, अभिमन्यू पोरजी, राजेश पोरजी, अक्रम शेख, ज्ञानेश्वर पोरजी, रवी पोरजी, अमीर पोरजी, विश्वनाथ पोरजी, सुरज गोंधळी, अमित पोरजी, रामू पोरजी, सलमान शेख, अरमान शेख, संजय गोंधळी, विजय गोंधळी, बाबुराव पोरजी, अनंता पोरजी, बंडू गोंधळी, रुपेश गोंधळी, अर्जुन गोंधळी, चंदा पोरजी, नंदा पोरजी, कीर्ती पोरजी, अश्विनी पोरजी, शारदा पोरजी, गौरी पोरजी, निकिता पोरजी, पद्मा पोरजी, राशिदा सुलतान शेख, जीवन पोरजी, पूनम गोंधळी, जागृती गोंधळी, कल्पेश गोंधळी, मोनिका पोरजी, स्वाती पोरजी, केतन गोंधळी, अक्षय पाटील, किरण पाटील, बारक्या पाटील, प्रियांका पोरजी, दिव्या पाटील, मनिषा पाटील, जोत्स्ना भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्धव गायकवाड मित्रमंडळ वार्ड क्र. 20 उदगीर यांच्या वतिने नवतरून नगरसेवक यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे) :** उदगीर येथे नव्याने झालेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये नव तरुण युवा पिढी व गरिबीची जान असलेले उदगीर नगर परिषद निवडणुक की मध्ये नव तरून नवीन नगरसेवक म्हणुन निवडून आलेले उदगीर मधील सर्व नगरसेवक पदावर विराजमान झालेली कर्तव्या दक्ष नगरसेवक यांचा सत्कार उद्धव गायकवाड मित्र मंडळ वार्ड क्र. 20 यांच्या वतीने करण्यात आला.



त्यावेळी उदगीर येथील नव तरुण नगरसेवक विजयभौया निटुरे, नरसिंगभाऊ शिंदे,बंटी ( धीरज ) कसबे,अनिलभाऊ मुधाळे,अमर सुर्यवंशी,प्रदिप महापुरे.जवाहरलाल काबळे,हसन चाऊस ,पाशाभाई मिर्झा,बाळासाहेब पाटोदे , सुशिरभाऊ भोसले, उपस्थित होते त्यांचा गायकवाड मित्र मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील पाच वर्ष जनतेची चांगली सेवा करावी व गोरगरिब जनतेचें प्रश्न मार्गी लावावे यासाठी उद्धव गायकवाड मित्र मंडळ वार्ड क्रमांक 20 यांच्यावतीने सत्कार करून पुढील वाटचालीस सर्व नव तरून यांना नगरसेवक शुभेच्छा देण्यात आल्या .त्यावेळी उद्धव गायकवाड मित्र मंडळाचे अध्यक्ष श्री .उद्धव गायकवाड, माजी . नगरसेवक गणेश गायाकवाड ,राहुल बिरादार , सम्रत गायकवाड , लक्ष्मण शिंदे , कृष्णा सकनुरे, राज गायकवाड , चंद्रकांत बिरादार , अजय मसोटे, प्रविण बिरादार , विकास सुर्यवंशी, नितीन , बिरादार , सुधाकर सुर्यवंशी, व उद्धव गायकवाड मित्र मंडळ सर्व कार्यकर्ते उपस्थित होते .

# कालिकादेवी महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** येथील कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विविध विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ या वर्षातील अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलीमध्ये विघ्नहर गणपती ओझर, गिरजात्मक गणपती लेण्याद्री, छत्रपती शिवाजी महाराज जन्मस्थळ शिवनेरी किल्ला, शिवकालीन जकात नाका नाणेघाट, देवस्थान शिर्डी साईबाबा, देवस्थान शनिशिंगणापूर अशा विविध ठिकाणी अभ्यासपूर्ण शैक्षणिक सहलीचे आयोजन करून त्या ठिकाणास भेटी देण्यात आल्या.



या शैक्षणिक सहलीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी परवानगी दिली.व ही शैक्षणिक सहल यशस्वी करण्यामध्ये डॉ. चेतना डोंगळीकर, डॉ.सय्यदअफरोज,डॉ. रमेश लांडगे,डॉ. संजय सावते , डॉ. राज कोरडे,डॉ. नवनाथ पवळे, श्री.बाळासाहेब बहिर यांनी मोलाचे योगदान दिले.

# समाजश्री प्रशांतदादा हिरे महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** आदिवासी सेवा समिती नाशिक संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरगाणा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एम. झेड. चौधरी अध्यक्षस्थानी होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य सांगितले. इतिहास विषयाचे प्रा. भागिनाथ टोपले यांनी सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिवस महाराष्ट्र सरकार बालिका दिन म्हणून साजरा करते. व पुणे विद्यापीठाचा नामविस्तार




सावित्रीबाई फुले विद्यापीठ असा करण्यात आला .त्यांच्या जीवनाविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रंजना भुसारे यांनी केले तर प्रा. विलास गोरी यांनी आभार मानले . यावेळी कार्यक्रमाला मोहण जोपळे, लक्ष्मण महाले तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# प्रभाग क्रमांक २ मध्ये भाजप महायुतीची भव्य प्रचार रॅली; मतदार नागरिकांचा भाजप महायुतीला वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक २ मध्ये भारतीय जनता पक्ष महायुतीच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करत प्रचाराचा भव्य शुभारंभ केला. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रचार पनवेल महानगरपालिका हद्दीत सुरू झाला. मतदार नागरिकांचा भाजप महायुतीला वाढता पाठिंबा मिळाल्याने या ठिकाणी महायुतीचे उमेदवार मोठ्या मतांनी विजयी होतील, असे चित्र आहे.

या प्रभागातून महायुतीने काजल पाटील, अरुणा दाभणे, दिनेश खानावकर आणि कृष्णा पाटील या चार उमेदवारांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे. प्रचाराच्या पहिल्याच दिवशी उमेदवारांनी



प्रभागातील प्रमुख भागांतून भव्य रॅली काढली. या रॅलीच्या माध्यमातून मतदारांशी थेट संवाद साधत गाठीभेटींवर भर देण्यात आला.प्रचारादरम्यान अरुणशेठ भगत यांनी सांगितले की, महापालिकेच्या स्थापनेपासून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचा ठोस अजेंडा राबविण्यात आला आहे. हाच विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून महायुती मतदारांसमोर जात आहे. आतापर्यंत केलेल्या कामांमुळे जनतेचा महायुतीवर पूर्ण विश्वास असून, प्रभाग क्रमांक २ मधील मतदार भाजपच्या चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या वेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हसळा तालुक्यात सर्वांगीण विकासाचा निर्धार - मंत्री आदिती तटकरे

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा तालुका प्रतिनिधी/ प्रा.शिरीष समेळ :** रायगड जिल्ह्याचे खासदार मा. सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा तालुक्यातील गाववाडी व वस्त्यांमध्ये जनतेला अपेक्षित असणारी विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामेही लवकरच पूर्ण केली जातील. भविष्यातही विकासकामांचा हा प्रवास अखंड सुरू राहील, असे प्रतिपादन राज्याच्या मंत्री मा. आदिती तटकरे यांनी केले.

म्हसळा तालुक्यातील मेंदडी जिल्हा परिषद गटांतर्गत पंचायत समिती गणनिहाय गावभेटी, ग्रामसंवाद तसेच मंजूर विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या.

या दौऱ्यात त्यांनी मेंदडी कोंड, मेंदडी गाव, खरसई, गणेश नगर, बनोटी, रेवली, आगरवाडा, वरवठणे, पेडांबे, वरवठणे कोंड, साळविंडे



बागाचीवाडी, साळविंडे देवळाचीवाडी, साळविंडे ताडाचीवाडी, तोंडसूरे जंगमवाडी, तोंडसूरे मूळगाव तसेच खारगाव खुर्द आदी गावांना भेटी देत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.

ग्रामस्थांचे ऋण व्यक्त करताना मंत्री तटकरे म्हणाल्या की, गेल्या दोन दशकांत प्रत्येक निवडणुकीत ग्रामस्थांनी आमच्यावर विश्वास ठेवून भरभरून प्रेम दिले. खासदार मा. सुनिल तटकरे यांच्यासह पक्षाच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून देत जनतेने विकासाच्या दिशेने साथ दिली आहे. पक्षाच्या माध्यमातून गावांचा विकास साधतानाच सामाजिक उपक्रमांत सहभागी होत वर्षातून चार ते पाच वेळा गावभेटी देऊन जिव्हाळ्याचे नाते जोपासले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आगामी निवडणुकांमध्येही ग्रामस्थांनी याचप्रमाणे सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत गावांच्या विकासकामांसाठी निधीची कोणतीही कमतरता पडू दिली जाणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले.

दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमास नायब तहसीलदार शेखर खोत, गटविकास अधिकारी माधव जाधव, उपपोलिस निरीक्षक सुनील रोहिणकर, बांधकाम अभियंता एस. आर. भगत, पाणीपुरवठा अभियंता अनिता दवटे, तालुकाध्यक्ष समीर बनकर, माजी सभापती महादेव पाटील, ज्येष्ठ नेते अंकुश खडस, रियाजभाई फकीह, माजी सभापती छाया म्हात्रे, माजी उपसभापती मधुकर गायकर, गणाध्यक्ष अनिल बसवत, सतीश शिगवण, शाहिद उकये, प्रकाश गाणेकर, चंद्रकांत कांबळे, सरपंच सुरेश शिगवण, उपसरपंच शीला पवार, स्वप्नील चांदोरकर, महिला अध्यक्षा मीना टिंगरे, मतदारसंघ महिला आघाडी प्रमुख सोनल घोले, गोपाल भायदे, माजी सरपंच वनिता खोत, महेश घोले, अनिल टिंगरे यांच्यासह अनेक मान्यवर व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# स्त्री शक्तीचा जागर! सावित्रीबाईंच्या जयंतीनिमित्त कृषि महाविद्यालय रिसोड द्वारे बालिका दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** दिनांक 3 जाने. 2026 ला डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला सलग्नीत सुविदे फाऊंडेशन रिसोड अंतर्गत कृषी महाविद्यालय रिसोड येथील रा.से.यो.एकक अंतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त प्रशमंजुषा , व कृषि मध्ये महिलांची भुमिका, स्त्री शिक्षण मध्ये सावित्रीबाई फुले यांचे योगदान व सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून कृषि महाविद्यालय रिसोडच्या वतीने बालिका दिन जल्लोष्यात साजरा करण्यात आला.कृषि महाविद्यालय रिसोड येथील प्रा. सिया टारपे , कु. अंजली पईणकर कु. सलोनी माळेकर यांच्या नियोजन मध्ये डॉ.ए.एम.अप्तुरकर प्राचार्य व श्री आर. एस. डवरे समन्वयक, डॉ. पि. जी. देव्हडे उपप्राचार्य कृषि महाविद्यालय रिसोड यांच्या शुभहस्ते क्रांतिज्योती प्रथम महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथी व इतर मान्यवर यांचे कु.प्रांजल इंगोले या विद्यार्थीनीनी स्वागत गीत गावून स्वागत केले. त्यानंतर कु .सिया टारपे प्राध्यापिका कृषी विस्तार विभाग कृषी महाविद्यालय रिसोड यांनी प्रास्तावीक मांडले. विद्यार्थ्यांमधून कु. रिया थोराईत, कु. कावेरी शेळके, कु.सलोनी माळेकर आणि राहुल जाधव, धीरज गवळी व शुभम हलगुंडे या विद्यार्थ्यांने क्रांतिज्योती



सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणामध्ये व महिला मुक्ती , महिला सक्षमीकरण मध्ये मोलाचा वाटा, आणि त्यांचे सामजिक कार्य इत्यादि संदर्भात मनोगत व्यक्त केले. आर. एस. डवरे यांनी आपल्या मनोगत मधून स्त्री शिक्षण, समाजामध्ये स्त्री चे स्थान आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य यामधून मुलींनी बोध घ्यावा असा प्रेरणादाई संदेश देऊन प्रोहत्सहित केले. प्रा. ए. बि. बाजड, प्रा एल. बि. काळे, प्रा. इरफान शेक, प्रा. सुरज माने, प्रा. गणेश हरणे, यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. ए. एम. अप्तुरकर प्राचार्य कृषि महाविद्यालय रिसोड यांनी आपल्या अध्येक्षीय भाषानामध्ये मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण कार्य , त्याग, आणि यांचा विचार करून त्यांचे कार्य स्मरणात ठेवून त्या दृष्टीने प्रयत्नशील रहा असा प्रेरणादायी संदेश यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांस दिला .सूत्रसंचालन कु.आस्था वानखडे व स्विटी इंगळे या विद्यार्थिनींनी केले.आभार प्रदर्शन प्रा. दिपक डी. मसुरकर कार्यक्रम अधिकारी रासेयो यांनी केले. डॉ. पि. जी. देव्हडे प्रा. एन ए. खडसे, जगन बोन्डे, विठ्ठल इडोळे, सागर तोंडे सह कृषी महाविद्यालय रिसोड येथील समस्थ शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कार्यक्रम यशस्वीतेकरिता उपस्थीती व सहकार्य लाभले

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - अॅड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११८ ■ सोमवार, ०५ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514







महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा.

मतदान : गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी स.७ ते सायं. ६ पर्यंत

मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 9920765765 या क्रमांकावर व्हाट्स अँप करा.

प्रकाशक : अॅड. चेतन जाधव, बीजेपी, पनवेल | मुद्रक : गौरव आर्टस् | प्रति ५००